सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १० सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आसुसची एमएसएमई क्षेत्रात नवी झेप

**मुंबई :** आसुस इंडियाला आपल्या एक्सपर्ट सीरीज़ पीसींच्या ' 'बिल्ट फॉर वरी फ्री बिझिनेस या वचनाला अधिक बळकटी देण्यासाठी, एमएसएमई तज्ञ आणि क्वांटम लीपचे संस्थापक, राजीव तलरेजा यांची एमएसएमई विभागासाठी मार्गदर्शक म्हणून घोषणा करताना अभिमान वाटत आहे.या महत्त्वपूर्ण, दीर्घकालीन सहकार्याचा उद्देश भारतीय एमएसएमई नेते व्यावसायिक संगणकांचा वापर कसा करतात याला पुनर्परिभाषित करणे, आणि त्यांना तांत्रिक अडथळ्यांवर मात करून शाश्वत उद्योजकीय वाढीवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करण्यासाठी सक्षम करणे हा आहे. भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे रोजगार देणारे क्षेत्र आणि एक मोठे आर्थिक इंजिन म्हणून, एमएसएमई वेगाने विस्तारत आहेत. ही गती कायम ठेवण्यासाठी, व्यवसाय मालकांनी एंटरप्राइझ वर्कलोडसाठी खास तयार केलेले पीसी वापरून दैनंदिन तांत्रिक अडथळे दूर केले पाहिजेत, ज्यामुळे उत्पादकता आणि सहयोग वाढतो.

## 'इंडियन आयडॉल 16' आता सोनी पलवर

**मुंबई:** देशातील लोकप्रिय गायनविषयक वास्तव कार्यक्रम इंडियन आयडॉलच्या १६व्या पर्वाचे प्रथमच विनामूल्य दूरचित्रवाणी वाहिनीवर प्रसारण होणार आहे. सोनी पलवर ७ सप्टेंबरपासून सोमवार ते शनिवार रात्री ९.३० वाजता हा कार्यक्रम प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आठवणींची गाण्यांची यादी या संकल्पनेवर आधारित या ८२ भागांच्या पर्वात देशभरातील १८ गुणी गायक सहभागी झाले आहेत. विविध पिढ्यांच्या आठवणींशी जोडलेली लोकप्रिय गाणी स्पर्धकांकडून नव्या अंदाजात सादर केली जाणार आहेत. सुरेल सादरीकरणासोबतच स्पर्धकांचा संघर्ष त्यांची स्वप्ने आणि प्रेरणादायी जीवनप्रवासही कार्यक्रमातून उलगडणार आहे.

## ऑक्सफर्ड'मध्ये ऑनलाइन पदवी घेऊ इच्छिणाऱ्यांची संख्या वाढत आहे

**पुणे, :** पुणे हे भारतातील कॅम्पस शिक्षणाचे एक प्रमुख केंद्र म्हणून प्रस्थापित झाले आहे. परंतु शहरातील ऑनलाइन पदवी घेऊ इच्छिणाऱ्यांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. कॉलेज विद्या प्लॅटफॉर्मच्या डेटानुसार, महाराष्ट्रातील एकूण प्रवेशांमध्ये आता पुण्याचा वाटा १३.२०% आहे, ज्यामुळे मुंबईनंतर (१९.५२%) राज्यात पुण्याचा दुसरा सर्वात मोठा वाटा आहे. महाराष्ट्रातील ऑनलाइन शिक्षण घेणाऱ्यांचे स्वरूप सध्या होत असलेले बदल दर्शवते. जवळपास चारपैकी तीन जण २६ वर्षांखालील आहेत, तरीही जवळपास तीनपैकी दोन जण पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. २१-२५ वयोगटातील लोकांचा वाटा २०२३-२४ मधील ४०.७४% वरून २०२५-२६ मध्ये ५७.१४% पर्यंत वाढतो, तर २६-३० वयोगटातील लोकांचा वाटा ३१.६१% वरून १५.२२% पर्यंत कमी होतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, शिक्षण ते करिअर या प्रवासात ऑनलाइन पदव्यांचा विचार खूप आधीच केला जात आहे.

## 1 अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक उभारणार

**मुंबई:** अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड (एएएचएल) ही अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड (एईएल) ची सहाय्यक कंपनी असून, भारतातील सर्वात मोठ्या खासगी विमानतळ ऑपरेटरपैकी एक आहे. कंपनीने अल्फा वेव्ह ग्लोबल, प्रेमजी इन्व्हेस्ट, टेमासेक आणि ब्लॅकरॉक यांच्याकडून व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या फंड्सच्या गुंतवणूकदारांच्या समूहासोबत सुमारे 9,825 कोटी रुपये (जवळपास 1 अब्ज अमेरिकी डॉलर) नवीन इक्विटी भांडवल उभारण्यासाठी करार केले आहेत. या व्यवहारानंतर एएएचएलचे व्यवहारापूर्वीचे इक्विटी मूल्यांकन सुमारे 18 अब्ज अमेरिकी डॉलर इतके होईल. भारताच्या विमानतळ पायाभूत सुविधा क्षेत्रातील वित्तीय संस्थांकडून होणाऱ्या मोठ्या नवीन इक्विटी गुंतवणुकींपैकी ही एक गुंतवणूक आहे.

# मराठा आरक्षण उपसमितीची अधिकाऱ्यांसमवेत मॅरेथॉन बैठक
# 'झिरो पेंडन्सी'चे उद्दिष्ट ठेवून काम करण्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश

**शिर्डी, दि. ९ प्रतिनिधी :** मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये जात प्रमाण पत्राच्या वाटपात शून्य प्रलंबित्व ( झिरो पेडन्सी) ठेवण्यासाठी प्रशासनाने आज मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील प्रातांधिकारी आणि जात पडताळणी अधिकाऱ्यांसोबत अडीच तास सविस्तर बैठक घेतली. १० सप्टेंबर पासून संपूर्ण मराठवाड्यात ८ जिल्ह्यात शिबिर आयोजित करण्यात आले असून एकही प्राप्त अर्ज निर्णयाविना शिल्लक राहणार नाही, असे उद्दिष्ट ठेवून काम करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री तथा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जात प्रमाणपत्र वाटपासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले असून आज आठही जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत प्रांताधिकारी आणि जात पडताळणी अधिकारी यांनाही बैठकीमध्ये समाविष्ट करण्यात आले होते. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगरच्या स्मार्ट सिटी कार्यालयात सकाळी ११ पासून अडीच तासाची मॅरेथॉन बैठक घेण्यात आली.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, सुलभता आणि गती आणावी. प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या कामाची अद्ययावत आकडेवारी दररोज प्रसारमाध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहोचवावी. तसेच नामंजूर अर्जांची कारणे स्पष्टपणे सार्वजनिक करावीत. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलदगतीने करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ वाढवून कार्यपद्धतीत सुधारणा कराव्यात, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीतील त्रुटी व अडचणींवर चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची बैठक स्मार्ट सिटी कार्यालयात झाली. या बैठकीला मुंबईहून दूरदृश्यप्रणालीद्वारे मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उप समितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. स्मार्ट सिटी कार्यालय येथे मराठी भाषा व उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, जालना जिल्हाधिकारी अशिमा मित्तल,बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जालना पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. परभणी, नांदेड, लातूर धाराशीव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

***कुणबी नोंदी नागरिकांना सहज उपलब्ध करा:***

कुणबी नोंदींचे संगणकीकरण करून गावनिहाय व मंडळनिहाय याद्या नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्याच्या कामाचा डॉ.विखे पाटील यांनी आढावा घेतला. जिल्ह्यांच्या अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध असलेल्या नोंदी नागरिकांना सहजपणे पाहता व शोधता याव्यात, यासाठी त्यांचे योग्य पद्धतीने प्रसिद्धीकरण करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

कुणबी नोंदी आढळलेल्या पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करता यावा, यासाठी जिल्हास्तरावर तसेच मंडळ स्तरावर १० ते १७ सप्टेंबर या कालावधीत विशेष शिबिरे आयोजित करावीत. या शिबिरांच्या माध्यमातून गावागावांत जनजागृती करून नागरिकांना अर्ज करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे व वंशावळीचे पुरावे याबाबत मार्गदर्शन करावे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक जिल्ह्यात नियुक्त केलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी या कामाचा नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर; 13 आणि 14 सप्टेंबरला विविध कार्यक्रम
## एशियाटिक सोसायटी, हिंदी राजभाषा संमेलनाला उपस्थित राहणार

**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह १३ आणि १४ सप्टेंबरला मुंबईच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर येणार असून, या दौऱ्यात फोर्टमधील दि एशियाटिक सोसायटीला भेट तसेच वाशी येथे होणाऱ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाला उपस्थिती लावणार आहेत. प्राच्यविद्या संशोधनाचा समृद्ध वारसा जपणाऱ्या एशियाटिक सोसायटीच्या भेटीत शाह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी आणि सदस्यांशी संवाद साधणार असून, दुर्मीळ पोथ्यांच्या प्रदर्शनालाही ते भेट देतील. त्यानंतर सोमवारी वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्रात होणाऱ्या सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनात ते सहभागी होतील.

एशियाटिक सोसायटीला 'राष्ट्रीय महत्त्वाची संस्था' असा विशेष दर्जा देण्याची मागणी गेल्या चार वर्षांपासून केंद्राकडे प्रलंबित आहे. शाह यांच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न मार्गी लागण्याच्या अपेक्षांना पुन्हा चालना मिळाली आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून याबाबतही शाह यांच्यासमोर भूमिका मांडली जाण्याची शक्यता आहे. शाह यांच्या भेटीदरम्यान संस्थेतील दुर्मीळ पोथ्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. त्यात पाच खंडांमध्ये प्रसिद्ध झालेल्या पा. वा. काणे यांच्या 'भारतीय धर्मशास्त्राचा इतिहास' या ग्रंथाचे संस्थेने जतन केलेले संदर्भसाहित्यही महत्त्वाचे ठरणार आहे. भारतीय दंड संहितेच्या उगमाशी धर्मशास्त्राचा संबंध असल्याचे मानले जात असल्याने या साहित्याला विशेष महत्त्व असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, एशियाटिक सोसायटीची अलीकडील निवडणूकही चर्चेत आली होती. जुलैमध्ये झालेल्या निवडणुकीत 'एशियाटिक टुमारो' या गटाने विजय मिळवला आणि भाजपचे माजी खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे अध्यक्ष झाले. त्यांच्या निमंत्रणानंतर शाह यांचा संस्थेचा दौरा निश्चित झाला आहे.

शाह यांच्या मुंबई दौऱ्याचा दुसरा टप्पा वाशीतील हिंदी राजभाषा संमेलनाचा असेल. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर १४ सप्टेंबरपासून वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्रात सहावे अखिल भारतीय राजभाषा संमेलन आयोजित करण्यात आले आहे. हे संमेलन १४ आणि १५ सप्टेंबर असे दोन दिवस चालणार असून, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची त्याला प्रमुख उपस्थिती असेल. देशभरातील हिंदी भाषिक साहित्यिक, संस्था, अधिकारी आणि प्रतिनिधी या संमेलनात सहभागी होणार आहेत. केंद्र व राज्य सरकारमधील वरिष्ठ मंत्री आणि अधिकारीही उपस्थित राहण्याची

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दुर्मिळ दस्तऐवजांचा नवीन खंड 20 ऑक्टोबर रोजी होणार प्रकाशित

**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे घेतलेल्या ऐतिहासिक बौद्ध धम्मदीक्षेशी संबंधित दुर्मिळ पत्रव्यवहार, कागदपत्रे आणि महत्त्वपूर्ण दस्तऐवज संकलित करून त्यांचा नवीन खंड प्रकाशित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत यासंदर्भातील सूचना देण्यात आल्या.

या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे यांच्यासह समितीचे इतर सदस्य उपस्थित होते.

## औराळा-निपाणी रस्त्यावर दुचाकीस्वारावर शस्त्राने हल्ला

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.०९ सप्टेंबर - दि.०९ सप्टेंबर - औराळा-निपाणी रस्त्यावर पेट्रोलपंपाजवळ दुचाकीवरून जाणाऱ्या भगवान कैलास बागुल यांना अडवून चोरट्यांनी धारदार शस्त्राने वार केल्याची धक्कादायक घटना घडली. हल्ल्यानंतर बागुल यांच्याजवळील रोकड घेऊन चोरटे पसार झाल्याची माहिती आहे. या घटनेमुळे औराळा परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या घटनेनंतर परिसरातील यापूर्वीच्या चोरीच्या घटनाही समोर येत आहेत. दि. ६ सप्टेंबर रोजी औराळा येथील देशी दारूचे दुकान चोरट्यांनी फोडून दारूसह रोकड आणि सीसीटीव्ही फुटेज असलेला डीव्हीआर लंपास केला होता. त्याच रात्री औराळा फाटा परिसरात बापू घोलप तसेच व्यापारी कैलास खंडेलवाल यांच्या घराच्या पाठीमागील कडी-कोंडे तोडून घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न झाला. मात्र घरातील सदस्य जागे झाल्याने त्यांनी आवाज दिला आणि चोरटे पसार झाले. सुभाष गायकवाड यांच्या ठिकाणीही चोरीचा प्रकार घडल्याची माहिती आहे. संतोष जैस्वाल यांची रोकड चोरीला गेल्याचे सांगण्यात येते. शेतकरी त्रिंबक वाघ यांच्या घराचाही कडी-कोंडा चोरट्यांनी तोडला.

विशेष म्हणजे, या घटनांपैकी अनेक प्रकरणांमध्ये अद्याप गुन्हा दाखल झालेला नसल्याची माहिती आहे. त्यामुळे या घटनांची अधिकृत नोंद आणि तपासाची स्थिती काय, हा प्रश्नही उपस्थित होत आहे. एकीकडे ६ सप्टेंबरला दुकान आणि घरांना लक्ष्य केले जाते, तर त्यानंतर रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकाला अडवून धारदार शस्त्राने हल्ला करून रोकड लुटल्याची घटना समोर येते.

## जमीन तारण ठेवून अवाजवी व्याज आकारल्याप्रकरणी दोघांना अटक

**अहिल्यानगर :** जमीन तारण ठेवून घेतलेल्या कर्जाच्या मोबदल्यात अवाजवी व्याज आकारून जमीन परत न केल्याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली.

पोलिसांच्या माहितीनुसार, आगरकर मळा येथील 77 वर्षीय दत्तात्रय जगन्नाथ आगरकर यांनी 2016 पासून सुरेश मोतीलाल कांकरिया यांच्याकडून जमीन तारण ठेवून सुमारे 2 कोटी रुपये कर्ज घेतले होते. त्यापोटी त्यांनी सुमारे 3.75 कोटी रुपये मुद्दल व व्याजासह परत केले. मात्र, तारण ठेवलेली जमीन परत न करता आरोपींनी अवाजवी व्याज आकारून आणखी 18 कोटी 38 लाख 14 हजार 695 रुपयांची मागणी केल्याची फिर्याद आहे.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात बीएनएसच्या विविध कलमांसह महाराष्ट्र सावकारी अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने 7 सप्टेंबर रोजी तारकपूर परिसरातून सुरेश मोतीलाल कांकरिया (64) आणि विनय गुरुलिंग होनराव (55) यांना ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी त्यांना तोफखाना पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात

# शिक्षक प्रशिक्षणात नियोजनाचा बोजवारा; चार वर्गखोल्यांचे नियोजन, प्रत्यक्षात दोनच
## १७६ शिक्षक हजर दाखवले; मात्र वर्गखोल्यांच्या अपुऱ्या व्यवस्थेमुळे शिक्षकांची गैरसोय

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.०९ सप्टेंबर - इयत्ता सहावीच्या बदललेल्या अभ्यासक्रमानुसार कन्नड शहरातील कै. झेलूबाई विद्यालय आणि महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यालय, म्हाडा कॉलनी येथे सुरू असलेल्या शिक्षक प्रशिक्षणाच्या नियोजनावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशिक्षणासाठी चार वर्गखोल्यांचे नियोजन करण्यात आले असताना प्रत्यक्षात केवळ दोनच वर्गखोल्यांमध्ये प्रशिक्षण सुरू असल्याचे आजच्या प्रत्यक्ष पाहणीत निदर्शनास आले.

दि. ८ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या या चार दिवसीय प्रशिक्षणासाठी उपलब्ध नोंदीनुसार जिल्हा परिषदेचे १२७ शिक्षक, तर १०० टक्के अनुदानित खासगी शाळांचे ४९ शिक्षक उपस्थित असल्याचे दाखवण्यात आले. कालच्या तुलनेत आज उपस्थितीचा आकडा मोठा असला, तरी प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या ठिकाणी उपलब्ध जागा आणि वर्गखोल्यांची व्यवस्था पाहता शिक्षकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे चित्र दिसून आले.

विशेष म्हणजे, प्रशिक्षणासाठी चार वर्गखोल्यांचे नियोजन करण्यात आलेले असताना प्रत्यक्षात केवळ दोन वर्गखोल्या वापरात असल्याचे आढळले. त्यामुळे उपलब्ध वर्गखोल्यांमध्ये शिक्षकांची मोठी संख्या बसवावी लागत असून, काही ठिकाणी एका बेंचवर तीन-तीन शिक्षकांना बसवून प्रशिक्षण घ्यावे लागत असल्याचे चित्र दिसले.

यामुळे प्रशिक्षणासाठी आलेल्या शिक्षकांना पुरेशी जागा उपलब्ध होत आहे का, त्यांना आरामदायी पद्धतीने प्रशिक्षण घेता येत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. चार वर्गखोल्यांचे नियोजन कागदावर असताना प्रत्यक्षात दोनच वर्गखोल्या उपलब्ध का करण्यात आल्या, याचे कारण स्पष्ट होणे गरजेचे आहे. या प्रशिक्षणासाठी एकूण ९ सुलभकांची व्यवस्था करण्यात आली असल्याचे नियोजनात नमूद आहे. मात्र सुलभकांची संख्या आणि प्रशिक्षणार्थी शिक्षकांची संख्या लक्षात घेता वर्गखोल्यांचे योग्य विभाजन होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ दोन वर्गखोल्यांमध्ये प्रशिक्षण घेण्याची वेळ आल्याने नियोजनाच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

एका बाजूला बदललेल्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण प्रभावीपणे देण्याचा उद्देश आहे, तर दुसऱ्या बाजूला प्रशिक्षण घेण्यासाठीच शिक्षकांना गर्दीच्या वर्गखोल्यांमध्ये बसावे लागत असल्याने प्रशिक्षणाच्या गुणवत्तेवर त्याचा परिणाम होणार नाही का, असा सवाल उपस्थित होत आहे.

दि.०८ च्या प्रत्यक्ष पाहणीत १९१ शिक्षकांच्या नोंदीपैकी केवळ ५६ शिक्षक प्रशिक्षणात उपस्थित असल्याचे चित्र समोर आले होते. त्यानंतर आजच्या नोंदीत जिल्हा परिषदेचे १२७ आणि १०० टक्के अनुदानित शाळांचे ४९ शिक्षक उपस्थित असल्याचे दाखवण्यात आले आहे. म्हणजेच एकूण १७६ शिक्षक उपस्थित असल्याची नोंद आहे. उपस्थितीच्या बाबतीत कालच्या तुलनेत आज चित्र सुधारलेले दिसत असले, तरी आता प्रशिक्षणाच्या व्यवस्थापन आणि नियोजनाचा प्रश्न पुढे आला आहे.

चार वर्गखोल्यांचे नियोजन असताना दोनच वर्गखोल्या प्रत्यक्षात वापरल्या जात असतील, तर उर्वरित दोन वर्गखोल्यांचे काय झाले? शिक्षकांना पुरेशी बैठक व्यवस्था का उपलब्ध करून देण्यात आली नाही? आणि प्रशिक्षणासाठी आधीच शिक्षकांची संख्या निश्चित असताना त्यानुसार वर्गखोल्यांची प्रत्यक्ष व्यवस्था का करण्यात आली नाही? इयत्ता सहावीचा अभ्यासक्रम बदलल्याने शिक्षकांना नवीन अभ्यासक्रम, संकल्पना आणि अध्यापन पद्धती समजावून देण्यासाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशिक्षण केवळ कागदोपत्री पूर्ण न होता शिक्षकांना योग्य वातावरणात आणि प्रभावीपणे प्रशिक्षण मिळणे अपेक्षित आहे.

प्रशिक्षणाच्या नियोजनात दोन वेळचा चहा, एक वेळचे भोजन, पिण्याचे पाणी आदी सुविधांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र या सुविधांसोबतच प्रशिक्षणासाठी आवश्यक वर्गखोल्या, बैठक व्यवस्था आणि पुरेशी जागा उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आता पुढील प्रशिक्षणाच्या दिवसांत वर्गखोल्यांची संख्या, शिक्षकांची बैठक व्यवस्था आणि प्रशिक्षणाच्या नियोजनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये सुधारणा होते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# कावड यात्रेने शहर झाले भक्तिमय; 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमले संभाजीनगर
## महाकाल पथकाच्या आकर्षक कलाविष्काराने यात्रेची रंगत वाढली; हजारो शिवभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग




तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** श्रावणी सोमवारनिमित्त आयोजित कावड यात्रेने सोमवारी शहराला भक्तिमय वातावरणाची अनुभूती दिली. 'हर हर महादेव', 'बम बम भोले'च्या जयघोषाने शहरातील प्रमुख रस्ते दुमदुमून गेले. पारंपरिक वाद्यांचा गजर, वारकरी भजने आणि उत्तर प्रदेशातील महाकाल पथकाच्या आकर्षक कलाविष्कारामुळे यात्रेला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले. हजारो शिवभक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत भगवान महादेवाप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली.

शिवशंभो प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार संजय केणेकर यांच्या संयोजनातून कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. श्री क्षेत्र सरला बेट संस्थानचे महंत रामगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी जाधववाडी येथील श्री रामेश्वर महादेव मंदिरातून यात्रेला प्रारंभ झाला.

यात्रेचा मार्ग टिळक चौक, गणेश कॉलनी, पंचायत समिती, चांदणी चौक, चेलिपुरा, शहागंज, महात्मा गांधी पुतळा, सिटी चौक, गुलमंडी आणि औरंगपुरा मार्गे खडकेश्वर मंदिर असा होता. यात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी नागरिक व शिवभक्तांनी सहभागींचे उत्स्फूर्त स्वागत केले. 'हर हर महादेव'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

कावड यात्रेत हलगी, संबळ, झांज आणि मृदंगाच्या तालावर शिवभक्तांनी उत्साहात सहभाग घेतला. वारकरी परंपरेतील भजने, गवळणी आणि अभंगांचे सादरीकरणही करण्यात आले. पारंपरिक वाद्यांच्या निनादामुळे यात्रेतील भक्तीमय वातावरणाला आणखी रंगत आली.

उत्तर प्रदेशातील महाकाल पथकातील कलाकारांनी सादर केलेल्या विविध कलाविष्कारांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या आकर्षक सादरीकरणाला उपस्थितांनी मोठा प्रतिसाद दिला.

खडकेश्वर मंदिरात यात्रा पोहोचल्यानंतर शिवभक्तांनी भगवान महादेवाचा जलाभिषेक करून पूजा-अर्चा केली. यावेळी मंदिर परिसरातही भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

कावड यात्रेच्या आयोजनात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गालंडे, शिवशंभो प्रतिष्ठानचे सागर भारस्कर, नगरसेवक राजगोविंद वानखेडे, जीवकपाल हिराळे, महेश माळवदकर, रामेश्वर भादवे, मुकेश जैन, सागर पाल आदींची उपस्थिती होती.

**SBI**
**भारतीय स्टेट बँक**
केंद्रीय भरती व पदोन्नती विभाग, कॉर्पोरेट सेंटर, मुंबई
दूरध्वनी: ०२२-२२८२०४२७
अर्जासाठी क्यूआर स्कॅन करा

**कंत्राटी तत्त्वावर विशेषज्ञ संवर्ग अधिकारी भरती**

भारतीय नागरिकांकडून कंत्राटी आधारावर खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**जाहिरात क्र.: CRPD/SCO/२०२६-२७/२१ (कंत्राटी पदे)**

| पदाचे नाव | रिक्त जागा | वय (३१.०८.२०२६ पर्यंत) |
|---|---|---|
| | | कमाल |
| ग्रुप सीआयएसओ (मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी) | १ | ५७ वर्षे |

पात्रता निकष (वय, अनुभव, नोकरीचे तपशील इत्यादि), रिक्त जागा तपशील, आवश्यक शुल्क आणि इतर तपशीलासाठी उपरोक्त विस्तृत जाहिरात क्रमांकांतर्गत बँकेच्या वेबसाईटवर **https://sbi.bank.in/web/careers/current-openings** लॉग ऑन करा. येथे ऑनलाईन अर्ज दाखल करण्याच्या व ऑनलाईन अर्ज शुल्क प्रदान करण्याच्या लिंक उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी व शुल्क भरण्यापूर्वी सविस्तर जाहिरात बघून आपली पात्रता आणि इतर तपशील यांची खात्री करण्यासाठी तपशीलवार जाहिरात तपासुन घ्यावी. काही शंका असल्यास, कृपया आम्हाला **"CONTACT US"** → **"Post Your Query"** या लिंकद्वारे लिहा, जी बँकेची वेबसाईट (**https://sbi.bank.in/web/careers/post-your-query**) वर उपलब्ध आहे.

- **ऑनलाईन अर्ज भरण्याची व शुल्क भरण्याची तारीख : ०४.०९.२०२६ ते २४.०९.२०२६.**

**स्थान**: मुंबई
**दिनांक:** ०४.०९.२०२६
**महाव्यवस्थापक (आरपी आणि पीएम)**

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## देवघराचे कुलूप तोडून चांदीचे दागिने, मंदिरातील रोकड लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ सप्टेंबर -**

तालुक्यातील सावरगाव येथे घरातील देवघराचे कुलूप तोडून चोरट्याने चांदीचे दागिने तसेच मंदिरातील रोकड असा एकूण २० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना ७ सप्टेंबर रोजी पहाटे घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिरुद्ध प्रभाकर हागरे हे सावरगाव येथे राहतात. ७ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२.४५ ते पहाटे २ वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घरातील देवघराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. देवघरातील लोखंडी पेटीत ठेवलेले सुमारे १३ तोळे चांदीचे दागिने चोरून नेण्यात आले.



तसेच गावातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील पात्रातील ७ हजार रुपयांची रोकडही चोरट्याने लंपास केली. या दोन्ही घटनांमध्ये एकूण २० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी अनिरुद्ध हागरे यांनी तामलवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तामलवाडी पोलिस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### आ. अंबादास दानवे यांनी घेतले श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर, दि.९ सप्टेंबर -**

महाराष्ट्रातील बळीराजा सध्या पावसाअभावी मोठ्या संकटात सापडला असून, शेतातील पिके करपण्याची वेळ आली आहे. हे संकट दूर करून महाराष्ट्रात धो-धो पाऊस पडावा आणि शेतकरी सुखी, समाधानी व समृद्ध व्हावा, अशी प्रार्थना माजी विरोधी पक्षनेते तथा आमदार अंबादास दानवे यांनी तुळजाभवानी मातेच्या चरणी केली. तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतल्यानंतर दानवे यांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीकडे लक्ष वेधले. मोठ्या कष्टाने उभे केलेले पीक पावसाअभावी वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे आई तुळजाभवानीने बळीराजावरील संकट दूर करून शेतशिवारात पुन्हा हिरवाई नांदवावी, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी जिल्हाप्रमुख रणजीत पाटील, शाम पवार, डॉ. जितेंद्र कानडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



### आशा कार्यकर्तींची क्षमता बांधणी कार्यशाळा

**लोहारा, दि.९ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यातील सास्तुर येथे कॅप्री ग्लोबल, आदित्य बिर्ला कॅपिटल फाउंडेशन आणि द प्राईड इंडिया मोबाईल मेडिकल युनिटच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या 'आरोग्य आपल्या दारी' प्रकल्पांतर्गत आशा कार्यकर्तींची क्षमता बांधणी कार्यशाळा स्पर्श रुग्णालयात आयोजित करण्यात आली. कार्यशाळेत असंसर्गजन्य आजार, किशोरवयीन मुलींचे आरोग्य, आरोग्य तपासणी, समुपदेशन व जनजागृती याबाबत आशा कार्यकर्तींना प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यकर्ती गावपातळीवर 'आरोग्य दूत' म्हणून काम करणार आहेत. प्रकल्पांतर्गत ७२ गावांतील किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी, तसेच १८ वर्षांवरील नागरिकांची मधुमेह व हृदयरोगाच्या जोखमीसाठी तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीच्या निष्कर्षानुसार आवश्यक वैद्यकीय सल्ला व समुपदेशन दिले जाणार आहे. कार्यशाळेस डॉ. अनिकेत इनामदार, गौरी कापरे, रमाकांत जोशी, अच्युत आदटराव, डॉ. वैशाली कुलकर्णी, डॉ. प्रशांत जाधव, डॉ. युवराज हाके आदी उपस्थित होते.



### शुभांगीची एमबीबीएससाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात निवड

**लोहारा, दि.९ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यातील हराळी येथील शुभांगी कालिदास सूर्यवंशी यांची कर्जत येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस शिक्षणासाठी निवड झाली आहे. चिकाटी, जिद्द आणि अथक परिश्रमाच्या जोरावर त्यांनी हे उल्लेखनीय यश संपादन केले. शुभांगी यांच्या यशामुळे हराळी परिसरासह पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण असून, त्या परिसरातील विद्यार्थिनींसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. त्यांच्या यशाबद्दल ग्रामस्थांच्या वतीने हराळी येथे कौतुक व सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष कॅप्टन सुरेश सूर्यवंशी, अनिल सूर्यवंशी, सचिन सूर्यवंशी यांच्या हस्ते शुभांगी यांचा सत्कार करण्यात आला.



### सोनारी शाळेच्या नूतन शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना

**परंडा, दि.९ सप्टेंबर -**

परंडा तालुक्यातील सोनारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या नूतन शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना मंगळवारी उत्साहात करण्यात आली. शासनाच्या नव्या नियमानुसार प्राथमिक व माध्यमिक शाळांचे एकत्रीकरण झाल्याने २० सदस्यांची संयुक्त शालेय व्यवस्थापन समिती निवडण्यात आली. अध्यक्षपदासाठी चुरस निर्माण झाल्याने लोकशाही पद्धतीने चिठ्ठी टाकून अंतिम निवड करण्यात आली. त्यामध्ये भारत जगताप यांची अध्यक्षपदी निवड झाली. उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वरी कुंभार यांची निवड करण्यात आली. इतर सदस्यांची निवड बिनविरोध आणि खेळीमेळीच्या वातावरणात झाली. सोनारी शाळेत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे वर्ग असून ३५० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## दुष्काळाचे सावट; पाण्यासाठी आतापासूनच सूक्ष्म नियोजन करा : पालकमंत्री सरनाईक

### जिल्ह्यात केवळ ८ टक्के जलसाठा, ऑगस्टमध्ये ७२ टक्के पावसाची तूट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ सप्टेंबर -**



यंदाचा पावसाळा जिल्ह्यासाठी आव्हानात्मक ठरत असून पावसातील दीर्घ खंडामुळे खरीप पिकांसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प व तलावांमध्ये सध्या केवळ ८ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, मागील वर्षी याच कालावधीत हा साठा २८ टक्के होता. त्यामुळे आगामी काळातील पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चाऱ्याचे आतापासूनच सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रशासनाला दिले.

मुंबई मंत्रालयातून दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील पाणीटंचाई व दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील काही भागांत तब्बल ३४ दिवसांचा पावसाचा खंड पडला असून, काही ठिकाणी दुष्काळी निकषांच्या पहिल्या टप्प्यातील स्थिती निर्माण झाली आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान अपेक्षेच्या तुलनेत पाऊस कमी झाला आहे. ऑगस्टमध्ये सरासरी १५४.४ मिलिमीटर पाऊस अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ ४३.१ मिलिमीटर पाऊस झाला. त्यामुळे ऑगस्टमध्ये तब्बल ७२.१० टक्के पावसाची तूट निर्माण झाली आहे.

धाराशिव जिल्ह्यात खरीप हंगामात तब्बल ४ लाख ६७ हजार हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली आहे. एकूण पेरणी क्षेत्रापैकी सुमारे ८७ टक्के क्षेत्र सोयाबीनखाली असल्याने जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांची भिस्त या पिकावर आहे. पावसातील दीर्घ खंडाचा सोयाबीनला मोठा फटका बसल्यास हजारो शेतकरी कुटुंबांच्या अर्थकारणावर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.

जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की, २०२५ मध्ये जिल्ह्यात ९७३.१ मिलिमीटर पाऊस झाला होता. यंदा ७ सप्टेंबरपर्यंत केवळ ३०५.३ मिलिमीटर पाऊस झाला आहे. पावसाची तूट आणि दीर्घ खंड हे दोन्ही घटक एकाचवेळी दिसत असल्याने अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थितीचे प्राथमिक संकेत निर्माण झाले आहेत.

शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच आवश्यक ठिकाणी स्वच्छतागृहांसाठी पाण्याच्या टाक्या बसवाव्यात. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्येही उष्णता कायम राहण्याची शक्यता लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना उष्माघाताचा धोका होणार नाही, यासाठी शिक्षण विभागाने दक्षता घ्यावी. आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालयांमध्ये आवश्यक उपचार सुविधा उपलब्ध ठेवाव्यात, असेही निर्देश त्यांनी दिले.

दरम्यान, उपलब्ध जलसाठ्याचा अनधिकृत सिंचनासाठी उपसा होऊ नये यासाठी भरारी पथके गठित करण्यात आली आहेत. संभाव्य पाणीटंचाई व दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने उपाययोजना करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.

#### पाणी बचतीसाठी गावोगावी जनजागृती



पालकमंत्री सरनाईक यांनी शेतकऱ्यांना आतापासूनच पाणी बचतीचे आवाहन करण्याच्या सूचना दिल्या. पाणीपुरवठ्याशी संबंधित निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, सरपंच व लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने गावपातळीवर जनजागृती करावी, तसेच शाळांमधून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचा संदेश द्यावा, असे त्यांनी सांगितले.

#### पीक पाहणीसाठी तज्ज्ञांच्या समित्या



पिकांची प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्यासाठी प्रत्येक तालुक्यात समित्या गठित करण्यात आल्या आहेत. या समित्यांमध्ये प्रशासनातील अधिकारी, कृषी विद्यापीठ व आयआयटी मुंबईचे तज्ज्ञ तसेच पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांचा समावेश आहे. मंडळनिहाय पीक परिस्थितीची पाहणी या समित्यांकडून सुरू असल्याचे जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले.

## अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ सप्टेंबर -**

तालुक्यातील एका गावातील १३ वर्षे १ महिन्यांच्या अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तसेच तिला व तिच्या आईला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी नळदुर्ग पोलिस ठाण्यात दोन तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी २०२६ ते मे २०२६ या कालावधीत आरोपींनी पीडित मुलीवर एका तरुणासोबत लग्न करण्यासाठी दबाव टाकला. लग्नास नकार दिल्याने तिला बेल्टने मारहाण करण्यात आल्याचे पीडितेने तक्रारीत नमूद केले आहे.

त्यानंतर संबंधित तरुणांनी तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

याशिवाय, या प्रकाराची माहिती कोणाला देऊ नये यासाठी पीडिता आणि तिच्या आईला जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.



**लग्नास नकार दिल्याने बेल्टने मारहाण; पीडिता व आईला जीवे मारण्याची धमकी**

पीडितेने ७ सप्टेंबर २०२६ रोजी नळदुर्ग पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांसह बाल लैंगिक अत्याचार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास नळदुर्ग पोलिस करीत आहेत.

## 'उमेद'च्या महिला बचत गटांचा विक्री महोत्सव



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ सप्टेंबर -**

गौरी-गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण महिला स्वयंसहाय्यता गटांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी 'उमेद' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा परिषदेसमोरील जागेत विक्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ७ ते २४ सप्टेंबरदरम्यान हा महोत्सव सुरू राहणार आहे.

जि.प. अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी महोत्सवाला भेट देऊन विविध स्टॉलची पाहणी केली. येथे गौरी-गणपतीच्या मूर्ती, तोरणे, पणत्या, दिवे, हस्तकला व पूजेचे साहित्य तसेच फराळ, मिठाई, मसाले, पापड, लोणची, चटण्या आदी घरगुती उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

महिला बचत गटांच्या उत्पादनांची गुणवत्ता व विविधतेची माहिती घेत अर्चनाताई पाटील यांनी ग्रामीण महिलांच्या कौशल्याला बाजारपेठ मिळाल्यास त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळेल, असे सांगितले. सणासुदीच्या खरेदीसाठी ग्राहकांनी महिला स्वयंसहाय्यता गटांच्या स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देऊन त्यांच्या मेहनतीला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

### आभाळाकडे नजर : हातात माती; सोयाबीनवर पावसाची टांगती तलवार...

## बैल पोळ्यावर दुष्काळाचे सावट; शेतकरी चिंतेत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ सप्टेंबर -**

मागील महिनाभरापासून पावसाने उघडीप दिल्याने धाराशिव जिल्ह्यातील खरीप हंगामातील पिकांवर गंभीर संकट ओढवले आहे. विशेषतः दाणे भरण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेत असलेल्या सोयाबीन पिकाला पाण्याची नितांत गरज असताना पावसाने पाठ फिरवल्याने अनेक भागांतील पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे हातातोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.



> बैल पोळा हा शेतकऱ्यांच्या जीवनाशी घट्ट जोडलेला आनंदाचा सण. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांना अंघोळ घालून सजवणे, शिंगांना रंग देणे, गळ्यात घुंगरू बांधणे, पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून त्यांचे पूजन करणे, अशी परंपरा आहे. मात्र यंदा पोळ्याच्या आनंदावरही पिकांच्या नुकसानीची चिंता दाटून आली आहे.

यंदा खरीप हंगामाच्या सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने सोयाबीनची पेरणी केली. पिकांची उगवणही चांगली झाली. मात्र गेल्या काही आठवड्यांपासून पावसाने दडी मारल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला आहे. अनेक ठिकाणी सोयाबीनची पाने पिवळी पडत असून झाडांची वाढ खुंटली आहे. शेंगा भरण्याच्या अवस्थेत असलेल्या पिकाला आता पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

सोयाबीनच्या पेरणीपासून बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत आणि मजुरीवर शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. यंदा उत्पादन चांगले येईल आणि खर्च भरून निघेल, अशी अपेक्षा होती. मात्र पावसाच्या लांबलेल्या खंडामुळे ही आशा आता धूसर झाली असून, कर्जाचा डोंगर आणि हातात आलेले पीक वाचविण्याचे आव्हान अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे.

### मद्यपी चालकवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ सप्टेंबर -**

धाराशिव शहरातील देशपांडे स्टॅण्ड परिसरात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविल्याप्रकरणी विजयकुमार राजाभाऊ जाधव (वय ४२, रा. राघुचीवाडी, धाराशिव) यांच्याविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## अस्मानी संकटाबरोबरच सुलतानी संकटामुळे शेतकरी आत्महत्या वाढल्या : ॲड. रेवण भोसले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ सप्टेंबर -**

मराठवाड्यातील शेतकरी अस्मानी संकटाबरोबरच सरकारी धोरणांच्या सुलतानी संकटामुळेही त्रस्त असून, शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप समाजवादी नेते ॲड. रेवण भोसले यांनी केला.

शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकत आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या आयात-निर्यात धोरणामुळे सोयाबीन, कापूस, कांदा, दूध व डाळवर्गीय पिकांच्या दरावर दबाव येत असून, जाहीर केलेला हमीभावही अनेकदा शेतकऱ्यांना मिळत नाही, असे भोसले यांनी म्हटले.



शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी ठोस धोरणांची गरज असून, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी आणि उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव मिळणे आवश्यक आहे. शासनाची शेतकरीविरोधी धोरणे कायम राहिल्यास मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी रस्त्यावर उतरून संघर्ष करतील, असा इशाराही ॲड. भोसले यांनी दिला.

## शिक्षणाची ज्ञानगंगा ग्रामीण भागात पोहोचविणाऱ्या शिंदे गुरुजींचा पुतळा अनावरण

### रा. गे. शिंदे महाविद्यालयात १०२ व्या जयंतीनिमित्त डॉ. विजय पांढरीपांडे यांच्या हस्ते सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.९ सप्टेंबर -**

श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, धाराशिवचे संस्थापक अध्यक्ष कै. रामचंद्र गेणुजी (रा. गे.) शिंदे यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त शहरातील रा. गे. शिंदे महाविद्यालयात सोमवारी (दि. ७ सप्टेंबर) त्यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय पांढरीपांडे यांच्या हस्ते हा सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी येरमाळा येथील ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोक मोहेकर, माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, बीड येथील बलभीम महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. वसंत सानप यांची प्रमुख उपस्थिती होती.

संस्थेचे अध्यक्ष सुनील शिंदे, उपाध्यक्ष रामभाऊ पडवळ, सचिव संजय निंबाळकर, सहसचिव शिलाताई डेते, कोषाध्यक्ष नवनाथ क्षीरसागर, सदस्य संजय पाटील दुधगावकर, शिवाजी निंबाळकर, राजेंद्र जाधव, डॉ. सुनील जाधव यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिंदे गुरुजींचे कुटुंबीय, आजी-माजी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व हितचिंतक उपस्थित होते. शिंदे गुरुजींच्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वतीने मागील आठ दिवसांपासून विविध शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जयंती उत्सवाच्या मुख्य कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुनील जाधव यांनी केले.



यावेळी संस्थेचे सचिव संजय निंबाळकर यांनी आपल्या मनोगतात शिंदे गुरुजींच्या कार्याला उजाळा दिला. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांपर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचविण्यासाठी त्यांनी आपले तन, मन आणि धन अर्पण केले. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली, असे सांगत त्यांनी गुरुजींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संभाजी धनवे व कीर्ती नलवडे यांनी केले.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर जिल्ह्यात ४३ गावात झळकल्या कुणबी नोंदी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ९ सप्टेंबर : जिल्ह्यात कुणबी नोंदींचा शोध घेणे, प्रमाणपत्रे वितरित करणे, वंशावळी जुळवणे आणि मराठा आरक्षणाशी संबंधित प्रशासकीय कामकाज गतीने पार पाडले जात आहे. न्यायमूर्ती शिंदे समितीच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्ह्यात आतापर्यंत तब्बल २९ लाख ४३ हजार ६९० नोंदींची तपासणी करण्यात आली आहे. या तपासणी मोहिमेदरम्यान ४३ गावांमध्ये एकूण १,०३२ कुणबी नोंदी आढळून आल्या असून या सर्व नोंदी नागरिकांच्या माहितीसाठी संबंधित ४३ ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केल्या आहेत, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावरही अपलोड करण्यात आल्या असल्याचे जिल्हा प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे. शोधलेल्या नोंदींच्या आधारे आणि नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जांनुसार कुणबी प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. जिल्ह्यात प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रशासनाकडे एकूण २ हजार ९२४ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २ हजार ८७० अर्जांची छाननी पूर्ण करून त्यांना प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत व ४७ अर्ज नाकारले असून सद्यःस्थिती केवळ ०७ अर्ज प्रक्रियेत आहेत. याशिवाय, हैद्राबाद गॅझेटिअरच्या आधारे कुणबी जातीचे दाखले देण्याबाबत ०२ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार प्राप्त ४० अर्जांपैकी २५ अर्ज मान्य करण्यात आले असून ०७ अर्जांवर कार्यवाही सुरु आहे. तसेच ०२ सप्टेंबर २०२५ नंतर सर्वसमावेशक (एकत्रित) कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रांसाठी प्राप्त झालेल्या ४६० अर्जांपैकी तब्बल ४४६ अर्ज मान्य करून वितरीत करण्यात आले आहेत.



## विविध वृत्त.....

### ११ सप्टेंबर रोजी विशेष सैनिकी मेळावा

तभा वृत्तसेवा

लातूर ९ सप्टेंबर : जिल्ह्यातील सर्व वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, शौर्य पदकधारक, माजी सैनिक तसेच माजी सैनिक विधवा यांच्यासाठी आर्मर्ड कोर सेंटर, अहिल्यानगर यांच्या सौजन्याने लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता एका विशेष सैनिकी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये -ीींशव, -ींू, च-ठ-ढक- डख, चरहरी ठशसीं आणि चशलह खपषरपींू या विविध रेकॉर्ड ऑफिसचे प्रतिनिधी विशेषत्वाने उपस्थित राहून सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबांच्या विविध समस्यांची नोंदणी करून त्यावर त्वरित उपाययोजना आणि आवश्यक ते मार्गदर्शन करणार आहेत.

या सैनिकी मेळाव्यात उपस्थितांसाठी मोफत वैद्यकीय व दंत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून विविध बँकांचे प्रतिनिधी व काउंटर, आधार कार्ड अपडेट व अपग्रेडेशनची सुविधा तसेच विविध प्रकारच्या वाहनांच्या अधिकृत डीलर्सचे स्टॉल्स देखील उपलब्ध करून दिले जाणार आहेत. लातूर जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, वीर नारी व त्यांच्या कुटुंबांनी या सैनिकी मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सर्व सुविधांचा आणि मार्गदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

### श्री गणेश उत्सवासाठी मिरवणूक वाहनांची तपासणी अनिवार्य

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ९ सप्टेंबर : येत्या १४ ते २९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत लातूर शहरात श्री गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवादरम्यान श्री गणेश स्थापना आणि विसर्जन मिरवणुकीकरिता वापरण्यात येणाऱ्या वाहनांची सुरक्षा तपासणी करण्याचे निर्देश लातूर पोलीस अधीक्षक यांनी दिले आहेत. गणेशोत्सव शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा यासाठी प्रशासकीय पातळीवर सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत.

या पार्श्र्वभूमीवर, गणेश मंडळांची गैरसोय टाळण्यासाठी आणि तपासणी प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी याकरिता प्रत्येक पोलीस स्टेशननिहाय 'एक खिडकी योजना' कार्यान्वित करण्यात आली आहे. याच ठिकाणी श्री गणेश स्थापना व विसर्जन मिरवणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली जाणार आहे. याकरिता संबंधित पोलीस ठाण्यात त्वरित अर्ज करावा. या अर्जासोबत वाहनाची सर्व वैध कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. अर्ज सादर केल्यानंतर वाहन तपासणीच्या वेळी संबंधित पोलीस ठाण्यात किंवा लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे प्रत्यक्ष वाहन हजर ठेवणे आवश्यक राहील, अशी माहिती लातूरचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे यांनी दिली आहे.

### 'थाई मागुर' माशाचे संवर्धन आणि विक्री न करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ९ सप्टेंबर : विदेशी मागुर हा मासा भक्षक स्वरूपाचा असून तो भारतातील स्थानिक जैवविविधता, मत्स्यसंपदा आणि पर्यावरणीय समतोलासाठी अत्यंत घातक असल्याने नागरिकांनी, शेततळीधारकांनी व मत्स्य व्यावसायिकांनी या माशाचे संवर्धन, विक्री, साठवणूक आणि वाहतूक करू नये, असे आवाहन लातूर मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्त कार्यालयाने केले आहे.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय हरित लवादाने २२ जानेवारी २०१९ च्या आदेशानुसार या माशावर पूर्णतः बंदी घातलेली असून केंद्र सरकारच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागानेही याच्या वापरावर बंदी लागू केली आहे. या आदेशानुसार थाई मागुरचे मत्स्यबीज संचयन करणे, संवर्धन करणे, उत्पादन घेणे, अवैध वाहतूक करणे किंवा आहारात वापर करणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

## लातूरला कृष्णा खोऱ्यातून पाणी येऊच शकत नाही

# लातूरकरांची सर्वजण फसवणूक करीत आहेत : आ. अंबादास दानवे

तभा वृत्तसेवा

लातूर दि.९ सप्टेंबर : केवळ घोषणाबाज सरकार आहे, शेतकरी दुष्काळाने टाहो फोडत आहे. उत्पन्न शंभर टक्के येणारच नाही पण सरकार जागे व्हायला तयार नाही. मराठवाड्यासाठी संभाजीनगर येथे मंत्रीमंडळाची बैठक घेतली तब्बल ३९ घोषणा केल्या पण लातूरकरांच्या हातात कांहीच पडले नाही. लातूरला कृष्णा खोऱ्यातून पाणी येऊच शकत नाही, लातूरकरांची सर्वजण फसवणूक करीत आहेत असा घणाघाती आरोप शिवसेना नेते आमदार अंबादास दानवे यांनी केला.




लातूर शहरातील गांधी चौक येथे शिवसेनेच्यावतीने तुमसे न हो पायेगा हे आंदोलन करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना अंबादास दानवे बोलत होते. या आंदोलनास शिवसेना संपर्वेप्रमुख रोहिदास चव्हाण, आमदार प्रविण स्वामी, आमदार कैलास पाटील, जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी, पप्पूभाई कुलकर्णी, डॉ.शोभा बेंजरगे, जयश्री उटगे, ॲड. राहूल मातोळकर, विष्णू साठे, दिनेश जावळे, बी.एन.डोंगरे, अविनाश रेशमे, सोमनाथ झुंजारे, बजरंग जाधव, यांच्यासह शिवसेनेचे, अंगीकृत संघटनेचे पदाधिकारी, शिवसैनिक नागरीक सहभागी झालेले होते.

यावेळी बोलताना अंबादास दानवे यांनी सांगीतले की, मराठवाडा हा राज्यातील एक अविकसीत भाग आहे त्यामुळे संभाजीनगर येथे मंत्री मंडळाच्या बैठका घेण्यात आल्या. मराठवाडयासाठी विविध घोषणा करण्यात आल्या. दोन बैठकांमधून तब्बल ७८० घोषणा मराठवाडयासाठी झाल्या तर लातूर जिल्ह्यासाठी ३९ घोषणा करण्यात आल्या. परंतू केवळ दिड टक्का कामांची स्थिती प्रगतीपथावर आहे. मराठवाडा निजामाच्या जोखडात होता. कासिम रझवी लातूरचा होता. त्याच्या क्रुरतेचा इतिहास गावागावात माहिती आहे, तसेच स्वामी रामानंद तिर्थांचा विचारही लातूरमधूनच सर्वांना प्राप्त झालेला आहे. लातूरमध्ये सशस्त्र क्रांती घडलेली आहे. येथे स्वतंत्र दैनिक काढण्यात आले होते, वंदे मातरम सत्याग्रह झाला, मराठी शाळा आणि वाचनालय काढले गेले. लातूरकरांना उजनीचे पाणी देण्याची घोषणा झाली.आले का पाणी लातूरला असा सवाल करत अंबादार दानवे यांनी कृष्णा खोऱ्यातील पाणी लातूरला येऊ शकत नाही. लातूरचा समावेश गोदावरी खोऱ्यात आलेत. एका खोऱ्यातील पाणी दुसरीकडे वळवण्यात येऊ शकत नाही असेही त्यांनी सांगीतले.

शेजारच्या जिल्ह्यातील राणा पाटील यांनी नुकतेच सांगीतल की, उजनीचे पाणी धाराशिवला आले आहे, पण पाण्याचा एक थेंबही तिथे अजून आलेला नाही, लातूरला वैंव्हापाणी येणार असा सवाल ही त्यांनी केला. उजनीचे पाणी लातूरला आणू म्हणणारे लातूरकरांची फसवणूक करत आहेत असेही त्यांनी सांगीतले. लातूरच्या कोच पैंक्टरीसाठी गुजराच्या दैनिकात जाहिरात दिली जाते. मुख्यमंत्री सांगून गेले ५० हजार नौकछ्या मिळणार, १० हजार जणांना प्रत्यक्ष काम मिळणार पण तो कारखाना रशियन कंपनीला चालवायला दिला आहे. लातूरमधील स्थनिकांना तिथे राजगारच नाही असेही त्यांनी सांगीतले.

भाजपच्या रुपाने आता मराठवाड्यात हे रझाकार आलेले आहेत, यापुर्वी मराठवाडयातील जनतेने निजामी रझाकाराला पळवून लावले आहे तसे यांनाही पळवून लावावे लागेल असेही त्यांनी सांगीतले.

आमदार प्रविण स्वामी, आमदार कैलास पाटील, संपर्क प्रमुख रोहदास चव्हाण, पप्पूभाई कुलकर्णी, जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी, डॉ. शोभा बेंजरगे, दिनेश जावळे यांनीही मार्गदर्शन केले. लातूरचे अनेक प्रश्न प्रलंबीत आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी सरकार काही करत नाही. आवश्यक कामे केली जात नाहीत. पण स्वतःची तुंबडी भरण्यासाठी शक्तीपीठ महामार्ग रेटला जात आहे. अहमदपूर, चावैूर, जळकोट येथे एमआयडीसीची केवळ घोषणाच झाली परंतू पुढे कांहीच झालेले नाही. लोकांना केवळ झुलवत ठेवण्याचे काम येथे झालेले आहे असेही यावेळी सांगण्यात आले.

सध्या भिषण दुष्काळाची स्थिती आहे. शासनाने मात्र केवळ बघ्याची भुमिका घेतलेली आहे. तातडीने दुष्काळ जाहिर करण्यात यावा यासाठी शिवसेना रस्त्यावर उतरुन आंदोलन करेल. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे सोयाबीन गेले होते यावर्षी पावसाअभावी सोयाबीन गेले आहे. दुष्काळ जाहिर करुन शेतकछ्यांना जो पर्यंत मदत दिली जाणार नाही तोपर्यंत शिवसेना आंदोलन सोडणार नाही असेही यावेळी सांगण्यात आले.सर्व मान्यवरांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लातूर जिल्ह्यातील प्रलंबीत मागण्यांचे निवेदन दिले. मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या युवकास यावेळी श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

### संगीत महोत्सवात गायकवाडांच्या सुरांची बरसात; शास्त्रीय गायनाने लातूरकर मंत्रमुग्ध

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ सप्टेंबर : गुरुवर्य पं. शांताराम चिगरी गुरुजी व गुरूमाई शकुंतलादेवी चिगरी यांच्या स्मरणार्थ सुरताल संगीत महाविद्यालय व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'सुरताल संगीत महोत्सवा'त शास्त्रीय गायनाच्या बहारदार सादरीकरणाने लातूरकर रसिक मंत्रमुग्ध झाले. अंजली गायकवाड, नंदिनी गायकवाड आणि पं. अंगद गायकवाड यांच्या कसदार आणि प्रभावी गायकीने रसिकांची मने जिंकली.

गुरुवर्य पं. शांताराम चिगरी गुरुजी व गुरूमाई शकुंतलादेवी चिगरी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी अध्यक्षस्थान श्रीमती सुमित्रा शांताराम चिगरी यांनी भूषविले. द्वारकादास श्यामकुमार महावस्त्र दालनचे तुकाराम पाटील यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुणे म्हणून कै. जनार्दनराव राजेमाने आश्रमशाळेचे प्राचार्य निलेश राजमाने आणि रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष रमेश चिल्ले उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नंदिनी गायकवाड हिच्या गायनाने झाली. तिने राग बागेश्रीमध्ये विलंबित एकतालातील 'सखी मन लागो ना' हा बडा ख्याल सादर करून मैफलीला सुरेल प्रारंभ करून दिला. त्यानंतर द्रुत एकतालातील 'डालो रंग मुँह पे ना' हा छोटा ख्याल सादर केला. अखेरीस 'चाहत सुधा सुरन गाना को' ही ठुमरी सादर करून नंदिनीने रसिकांना भावसंगीताचा आनंद दिला.

यानंतर अंजली गायकवाड हिने राग पुरिया सादर केला. तिने झुमरा तालातील 'प्यार दे गर लागी' हा बडा ख्याल अत्यंत प्रभावीपणे सादर केला. त्यानंतर तीनतालातील 'रूप जो बन का मान न करिये' हा छोटा ख्याल सादर करून आपल्या स्वरवैविध्याची आणि तालावरील पकडीची प्रचिती दिली.

कार्यक्रमाचा उत्तरार्ध पं. अंगद गायकवाड यांनी गाजवला. त्यांनी राग शुद्ध कल्याणमध्ये विलंबित एकतालातील 'बोल न लागी' हा बडा ख्याल सादर केला. त्यानंतर तीनतालातील 'मंदलवा बाजो रे' हा छोटा ख्याल सादर केला. कार्यक्रमाचा समारोप राग भैरवीतील 'धन्य भाग सेवा का अवसर पाया' या भावपूर्ण रचनेने झाला.

कलाकारांना तानपुरावर पूजा दहिफळे, हार्मोनियमवर विजय श्रीमंगले, तबल्यावर पुण्याहून आलेले चैतन्य पवार, तर पखवाजवर विष्णू जगताप यांनी उत्कृष्ट साथसंगत केली.

महोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सुरताल संगीत महाविद्यालयाशी जोडल्या गेलेल्या लातूरमधील विविध संगीत शिक्षकांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला.

### अत्यल्प पावसामुळे सर्वत्र भयावह परिस्थिती शासनाने तात्काळ दुष्काळ जाहीर करावा

## मुख्यमंत्र्याकडे लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ सप्टेंबर : पावसाच्या अत्यल्प प्रमाणामुळे खरिपाची उभी पिके वाळून जात आहेत. पिण्याच्या पाण्याचा व गुरांच्या चाऱ्याचा प्रश्र्न गंभीर निर्माण झाल्याने तात्काळ लातूर ग्रामीणसह मराठवाड्यात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.



लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रासह मराठवाड्यातील बहुतांशी भागात गेल्या काही दिवसांपासून पावसाने मोठी ओढ दिल्याने शेतकरी आणि सर्वसामान्य जनता गंभीर संकटात सापडली आहे. पावसाने दडी मारल्याने शेतातील उभी खरीपाची पिके वाळून जात आहेत.

लातूर ग्रामीण कार्यक्षेत्रातील अर्थकारणाचा कणा असलेल्या सोयाबीन आणि ऊस पिकाची परिस्थिती अत्यंत विदारक असून इतर पिकाची दयनीय अवस्था झाली आहे. सोयाबीन पिक सध्या शेंगा आणि शेंगात दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना पावसाने पाठ फिरवल्यामुळे सोयाबीनची पूर्णपणे वाढ खुंटली असून उन्हाच्या तीव्रतेने पिके जागच्या जागीच करपून गेली आहेत. तर पाण्याअभावी ऊसाची वाढ थांबली असून ऊस वाळू लागला आहे. पिकांसाठी केलेला बियाणे, खते, औषधे, मशागत व मजुरीचा खर्च मोठ्या प्रमाणात झालेला असताना उत्पादन हातातून जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. सोयाबीन आणि उसावर लाखो रुपये खर्च करून जगवलेली पिके डोळ्या देखत जळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी निवेदनात नमूद केले आहे.

अत्यल्प पावसामुळे नदी नाले तलाव आणि विहिरी कोरड्या पडू लागल्या आहेत. भूजल पातळीत मोठी घट झाली आहे. आत्ताच ही परिस्थिती असल्याने आगामी काळात माणसासह गुरांच्या पिण्याचा प्रश्र्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्र्न भयावह झाला आहे. जनावरांना जगवायचे तरी कसे या चिंतेने शेतकरी खचून जात आहे.

शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक गणित खरीप हंगामावर अवलंबून असते. पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना कर्जाची परतफेड, पुढील हंगामाचा खर्च, कुटुंबाचा उदरनिर्वाह तसेच मुलांचे शिक्षण व इतर दैनंदिन गरजा भागविणे कठीण होणार आहे. त्यामुळे सध्याची परिस्थिती ही केवळ पिकांची समस्या नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोरील गंभीर संकट आहे.

निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यावर पुन्हा एकदा संकट ओढवले आहे या पार्श्र्वभूमीवर शासनाने पिकाची सद्यस्थिती पाहता तात्काळ पंचनामे करावेत. पिण्याच्या पाण्याचे संकट आणि गुरांच्या चाऱ्याचा प्रश्र्न या सर्व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघासह मराठवाड्यात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्याला आधार देऊन संकटातून सावरण्यासाठी मदतीचा हात द्यावा अशी मागणी ही लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

## गणेशोत्सव निमित्त निलंगा पोलीस ठाणे येथे शांतता समितीची बैठक संपन्न

### डीजे, डॉल्बीमुक्त सांस्कृतिक उपक्रमाने गणेशोत्सव साजरा करा

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ९ सप्टेंबर : आगामी गणेशोत्सवाच्या निमित्ताने निलंगा पोलीस ठाणे येथे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली निलंगा उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल ढुमे, पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी ही बैठक आयोजित केली होती.




यावेळी शांतता बैठकीत निलंगा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, विनोद आर्य, नगरसेवक अजित नाईकवाडे, ईश्र्वर पाटील, दत्ता मोहोळकर यांच्यासह आरोग्य विभाग, महावितरण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, विविध पक्ष संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते, गणेश मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी व नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी नागराध्यक्ष संजयराज हलगरकर, शिवसेनेचे विनोद आर्य यांच्यासह उपस्थित विविध अनेक मान्यवरांनी गणेशोत्सव निमित्त महत्वपूर्ण विविध सूचना मांडल्या,

आगामी गणेशोत्सवाच्या निमित्ताने निलंगा पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गणेश मंडळांना महत्त्वाचे आवाहन केले असून, गणेशोत्सवादरम्यान डीजे आणि डॉल्बीचा वापर पूर्णपणे टाळण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत शांततामय, प्रदूषणमुक्त आणि सांस्कृतिक वातावरणात गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल ढुमे, पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी केले आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. या उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन व्हावे, हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे. मात्र, उत्सवादरम्यान मोठ्या आवाजात डीजे, डॉल्बी अथवा तत्सम ध्वनिवर्धक यंत्रणांचा वापर केल्यामुळे ध्वनिप्रदूषणाचा प्रश्र्न निर्माण होतो. त्याचा परिणाम ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण तसेच विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांवर होऊ शकतो. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव ध्वनिप्रदूषणमुक्त आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यावर पोलिसांनी भर दिला आहे.

गणेश मंडळांनी डीजे किंवा डॉल्बी ऐवजी ढोल-ताशे, लेझीम, हलगी, टाळ-मृदंग यांसारख्या पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देऊन गणेशोत्सवातील सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

उत्सवाच्या काळात कोणत्याही प्रकारे नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी घ्यावी, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

गणेशोत्सव हा आनंदाचा आणि श्रद्धेचा उत्सव असून, तो सर्व समाजघटकांना सोबत घेऊन साजरा व्हावा, अशी पोलिसांची भूमिका आहे. उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये आणि गणेशोत्सवाचे पावित्र्य व सांस्कृतिक स्वरूप कायम राहावे, यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात येत आहे.

गणेश मंडळांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करून 'नो डीजे, नो डॉल्बी' या भूमिकेला सकारात्मक प्रतिसाद द्यावा. पारंपरिक वाद्यांच्या साथीने, सामाजिक सलोखा आणि बंधुभाव जपत शांततामय, शिस्तबद्ध, सांस्कृतिक आणि प्रदूषणमुक्त गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. गणेशोत्सव आनंदाचा असावा, आवाजाचा नव्हे; परंपरेचा असावा, प्रदूषणाचा नव्हे. असेही यावेळी आवाहन करण्यात आले. सदरील शांतता बैठकीचे सूत्रसंचालन सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद वाघमारे यांनी केले तर बैठकीसाठी आलेल्या सर्व मान्यवारांचे आभार सहाय्यक पोलीस निरीक्षक धनाजी खापरे यांनी मानले, या बैठकीचे परिश्रम दादा शिंदे व प्रकाश चव्हाण यांनी घेतले.

## लातूर जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ९ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात यावा,अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, यावर्षी लातूर जिल्ह्यात सर्वत्र अत्यल्प पाऊस झाल्याने शेतकऱ्यांना वेळेवर पेरण्या करता आलेल्या नाहीत. ज्या ठिकाणी पेरणी केली होती, त्या ठिकाणी मागच्या दोन महिन्यापासून पुरेसा पाऊस न झाल्याने पिके अक्षरशः वाळून गेली आहेत. त्यामुळे जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सोयाबीन साठी एकरी ७० हजार, ऊसासाठी एकरी एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे, जनावरांसाठी चारा करावी, विंधनविहिर, विहिरींचे अधिग्रहण करण्यात यावे,सन २०२५ - २६ मध्ये अतिवृष्टी झाल्याने पिकांचे नुकसान झाले होते. त्याचा विमा शेतकऱ्यांना त्वरित देण्यात यावा. चालू थकबाकीदार शेतकऱ्यांना देखील दोन लाख रुपये कर्जमाफी देण्यात यावी, शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक फीस माफ करण्यात यावी,अशा मागण्याही करण्यात आलेल्या आहेत. या निवेदनावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष धर्मराज पाटील, माणिक गायकवाड, उपाध्यक्ष महारुद्र चौंडे, व्यंकट मुळके, प्रकाश रोडगे, संतोष सोनपेटकर, ज्ञानेश्र्वर शिंदे, काकासाहेब शिंदे, रमाकांत मोरे, अजयकुमार बिरले, मधुकर मायंदे, गणेश चौंडे, काशिनाथ तळेकर, ईश्र्वर धुमाळे, अशोक धुमाळे, सिद्धेश्र्वर पाटील, सूर्यकांत सोनटक्के, जगदीश साकोळे , मल्लिकार्जुन भुरे, शिवशंकर डोंगरे, अफसर मुल्ला, एड. विजयकुमार जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अग्रलेख

# पुनर्विकासासह नियमांची पुनर्रचनाही हवी

रविवारी दुपारी दिल्ली विद्यापीठाच्या परिसरातील सत्य निकेतनमध्ये विद्यार्थ्यांचे वसतिगृह म्हणून वापरली जाणारी एक जुनी इमारत कोसळली. एकूण पाच मजले असलेल्या या इमारतीच्या तळमजल्यावर दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यादरम्यान एका कॉलमला धक्का लागल्याने ही संपूर्ण इमारतच कोसळल्याचे पोलिसांनी सांगितले. या इमारतीत एकूण पंधरा खोल्या होत्या आणि तिथे प्रत्येकी दोन ते तीन याप्रमाणे जवळपास पन्नास विद्यार्थी राहत होते. रविवारची सुटी असल्याने बहुतांश विद्यार्थी खोल्यांमध्येच होते. अशातच ही दुर्घटना घडली आणि त्यात पाच विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. अनेक जण जखमी झाले. पोलिसांनी या इमारतीच्या मालकावर गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. लवकरच तो त्यांच्या हाती लागेलही. पण, जवळपास पन्नास वर्षे जुन्या असलेल्या या इमारतीच्या कोसळण्याने अनेक प्रश्न नव्याने उभे राहिले आहेत. मुळातच सत्य निकेतनमधील ही इमारत इतकी जुनी असतानाही तिचा निवासी स्वरूपाचा वापर कसा काय सुरू होता, हा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे. या इमारतीला पाच मजले होते, पण बांधकामाची परवानगी केवळ तळमजला आणि एकाच मजल्यासाठी होती, अशी माहिती दिल्ली महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. याचा अर्थ, एवढ्या जुन्या इमारतीमधले वरचे तीन मजले बेकायदा असल्याचे एक तर पालिकेच्या अधिकाऱ्यांना, विशेषतः त्या प्रभागातील कर्मचाऱ्यांना इतके दिवस समजले नाही किंवा त्याकडे सहेतुक दुर्लक्ष करण्यात आले. कारण काहीही असले, तरी यामध्ये ज्या मुलांचा बळी गेला, त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी पाहिलेली स्वप्ने मात्र काही क्षणांत दगड-विटांच्या ढिगाऱ्याखाली कायमची चिरडली गेली. ही दुर्दैवी घटना दिवसाउजेडी घडल्याने किमान लगेच लक्षात आली आणि तिथे वेळेत मदत पोहोचू शकली. ती रात्री घडली असती, तर कदाचित तिची भीषणता आणखी वाढली असती. ही दुर्घटना जिथे घडली, त्या परिसरात अनेक अरुंद गल्ल्या आहेत. त्यामुळे तिथे पोहोचताना मदत आणि बचाव पथकांनाही अडथळ्यांचा सामना करावा लागला. ढिगाऱ्याखाली दबलेले विद्यार्थी मोबाईलवरून इतरांकडे मदतीची याचना करीत होते. त्यापैकी आदित्य नावाच्या कॉमर्सच्या विद्यार्थ्याने ढिगाऱ्याखालून केलेल्या व्हिडीओ कॉलची क्लिप समाजमाध्यमांवर व्हायरलही झाली आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने ग्रामीण तसेच निमशहरी भागातील तरुणांचा शहरांकडे ओघ वाढला आहे. तिथे उच्च शिक्षणासोबत नोकरीच्या संधीही मिळत असल्याने साहजिकच मिळेल त्या ठिकाणी आणि अल्प सुविधा असूनही कमीत कमी खर्चात वास्तव्याला प्राधान्य दिले जाते. काही वर्षांचाच काळ काढायचा असल्याने शहरांमध्ये येणारे विद्यार्थी वा नोकरीसाठी स्थलांतरित होणारी कुटुंबे जिथे जागा मिळेल, तिथे बिऱ्हाड थाटतात. पण, अनेकदा त्यांच्या निकडीचा गैरफायदा घेऊन धोकादायक स्थितीतील इमारतींमध्ये जागा दिली जाते. कुटुंब किंवा विद्यार्थी भाडेकरू म्हणून ठेवताना, दुकानांना गाळे भाड्याने देताना संबंधित जागामालक रहिवाशांच्या सुरक्षिततेपेक्षा केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्याचा विचार करताना दिसतात. महानगरात अशा इमारतींमध्ये राहणारे विद्यार्थी अथवा कुटुंब दोन-तीन वर्षांनी जागा बदलतात. त्यामुळे आपली इमारत किती जुनी वा जीर्ण आहे, याची फारशी माहिती कुणी घेत नाही. बहुतांश मोठ्या शहरांमध्ये कमी-अधिक फरकाने हीच स्थिती असते. संबंधित यंत्रणांना न जुमानता आणि बऱ्याचदा त्यांच्या 'अर्थ'पूर्ण दुर्लक्षाने जुन्या, दाट लोकवस्तीच्या भागातील जीर्ण इमारतींचा रहिवासी वापर सुरू राहतो. वास्तविक धोकादायक इमारतींमध्ये कोणत्याही प्रकारे वास्तव्याला प्रतिबंधच असायला हवा. महापालिका अथवा नगरपालिकांकडून संबंधित मालकाला अनेकदा नोटिसा देण्यात येतात. पण, बहुतांश वेळा या सोपस्कारापलीकडे कोणतीही कठोर वा दंडात्मक कारवाई होत नसल्याने त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. परिणामी अशा धोकादायक इमारतींचा वर्षानुवर्षे बिनदिक्कत वापर होत राहतो. पालिका, वीज वितरण कंपनी, वाहतूक पोलिस आणि अन्य यंत्रणांमधील संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रसंगी 'लक्ष्मीदर्शन' घडवून कारवाईची टांगती तलवार आपल्या शिरावर पडणार नाही, याची खबरदारी घेतली जाते. खरे तर, तीन-चार किंवा त्याहून अधिक दशके जुन्या असलेल्या इमारतींचा रहिवासी वापर, त्यातून निर्माण झालेले धोके आणि अशा इमारतींचा पुनर्विकास हा वेगाने नागरीकरण होत असलेल्या सर्वच शहरांसमोरचा मोठा प्रश्न आहे. सर्व इमारतींची अवस्था वाईट नसली तरी बहुतेक जुन्या इमारतींमध्ये सरत्या वर्षागणिक धोक्यांची भर पडतेच. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या महानगरांत गेल्या काही वर्षांमध्ये जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला गती मिळाली आहे. मुंबईत बीडीडी चाळीसारख्या जुन्या इमारतींमधील रहिवाशांना नव्या, भक्कम प्रकल्पांमध्ये हक्काच्या सदनिका देण्यात येत आहेत. तथापि, आजही, विशेषतः पावसाळ्यात एखादी इमारत दुर्घटना तेथे घडते, हे वास्तव आहे. पालिका आणि महापालिका क्षेत्रातील तीस वर्षांपेक्षा जुन्या असलेल्या सर्वच इमारतींचे नियमित स्ट्रक्चरल ऑडिटही व्हायला हवे. या ऑडिटच्या अहवालानुसारच संबंधित इमारत निवासायोग्य आहे की नाही, हे निश्चित केले जावे.

सर्वच मोठ्या शहरांतील अनेक दशकांपूर्वीच्या बहुतांश इमारती त्या काळातील बांधकामाच्या पद्धती आणि दर्जामुळे आता जीर्ण झालेल्या असणे स्वाभाविक आहे. त्यातच अशा अनेक इमारतींच्या आजूबाजूला नव्याने उत्तुंग टॉवर, महाकाय प्रकल्प उभे राहतात. परिणामी या इमारती अंतर्बाह्य धोक्याने वेढलेल्या असतात. भूमिगत जलवाहिन्या आणि गटारी, भुयारी रस्ते, विविध प्रकारच्या केबल्ससाठी लागणारे डक्ट अशा सगळ्या कामांकरिता जमिनीखाली मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जाते. हे करताना खोदकामाच्या ठिकाणापासून विशिष्ट अंतरावरील इमारती, बांधकामांना होणाऱ्या संभाव्य धोक्याचा विचार केला जातो. परंतु, अशा इमारतींचे आयुर्मान विचारात घेऊन त्यांच्या पायापासून ते शेवटच्या मजल्यापर्यंत संपूर्ण स्ट्रक्चरल ऑडिट केले जात नाही. भूमिगत कामे करणारी यंत्रणा आणि संबंधित पालिका केवळ जमिनीवर साकारणाऱ्या प्रकल्पाचा भविष्याच्या दृष्टीने विचार करून त्याप्रमाणे नियोजन करतात. उदाहरणच घ्यायचे, तर तीस वर्षांनंतरच्या लोकसंख्येचा विचार करून भूमिगत मार्ग किंवा मेट्रोची उभारणी होत असेल, तर त्या कालावधीपर्यंत संबंधित मार्गालगत असलेल्या इमारती आणि त्यांचा पाया तेवढाच मजबूत राहील काय, असा दीर्घकालीन विचार होताना दिसत नाही. जुन्या इमारतींचे उभारणीपासूनचे साधारण आयुर्मान, नंतर झालेले अतिरिक्त बांधकाम आणि लगतच्या भागात होणारी जमिनीवरची तसेच भूमिगत कामे यामुळे त्या इमारती नेमक्या कोणत्या स्थितीत आहेत, याचा नगररचना व वास्तुतज्ज्ञांकडून समग्र अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. त्या आधारे संबंधित राज्य शासनाने पालिका क्षेत्रासाठी नवी नियमावली तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. असे झाल्यास संबंधित पालिका आणि यंत्रणांना भविष्यातील धोक्याची माहिती मिळून नव्या बांधकामाच्या किंवा प्रकल्पाच्या आराखड्यातच तशी प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येईल. जुन्या, जीर्ण इमारतींच्या अतिरिक्त, अतिक्रमित बांधकामांवर वेळीच कारवाई आणि त्यांच्या रहिवासी वापराला कठोरपणे प्रतिबंध व्हावा. त्याचप्रमाणे जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासोबतच त्यांच्या वापराबाबत असलेल्या नियमांचीही काळानुरूप पुनर्रचना केल्यास भविष्यात दिल्लीसारख्या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही. ■

## आंतरराष्ट्रीय

# दहशतवादाचे नवे समुद्री समीकरण

**प्रा. जयसिंग यादव**

सोमालियामधील जिब्रिल 'वन-आर्म्ड' याह्या अली या व्यक्तीने येमेनमधून लष्करी दर्जाची शस्त्रे मिळवून 'अल-शबाब' या सोमालिअयन अतिरेकी संघटनेपर्यंत पोहोचवली. या व्यवहारात येमेनमधील शस्त्र व्यापाऱ्यांच्या माध्यमातून हुतींकडून शस्त्रे मिळवली गेल्याचा दावा करण्यात आला आहे. ही माहिती बारीक तपशिलानिशी पडताळली जाणे आवश्यक असले, तरी अशा नेटवर्कची शक्यता नाकारता येत नाही. कारण येमेन आणि सोमालिया यांच्यातील समुद्री भौगोलिक जवळीक, अस्थिर राजकीय परिस्थिती आणि दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेली तस्करीची मार्गव्यवस्था यामुळे अशा हालचालींसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. या घटनेतील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दहशतवादाच्या जगात वैचारिक शत्रुत्वापेक्षा व्यावहारिक हितसंबंध वरचढ ठरत आहेत का, हा प्रश्न. हुती हे इराणशी जवळीक असलेले शिया झैदी बंडखोर आहेत, तर 'अल-शबाब' ही सुन्नी कट्टरतावादी आणि 'अल-कायदा'शी संबंधित संघटना आहे. दोन्ही संघटनांच्या विचारसरणीत आणि प्रादेशिक उद्दिष्टांमध्ये मूलभूत फरक आहे. यापूर्वी 'अल-कायदा' आणि हुती यांच्यात संघर्षही झाला आहे. त्यामुळे या दोन्हींचे संबंध एखाद्या औपचारिक दहशतवादी आघाडीच्या स्वरूपात आहेत, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल; मात्र दहशतवादी संघटनांना कायमस्वरूपी मित्र नसतात. त्यांचे व्यवहार प्रामुख्याने हितसंबंधांवर आधारित असतात. शस्त्रांची गरज असलेल्या संघटनेला शस्त्रे मिळत असतील आणि शस्त्रपुरवठा करणाऱ्या घटकाला त्यातून पैसा, प्रभाव किंवा नवीन भौगोलिक संपर्क मिळत असेल, तर वैचारिक मतभेद तात्पुरते बाजूला ठेवले जाऊ शकतात. याच कारणामुळे 'हुती-अल-शबाब' संपर्काची शक्यता गंभीरपणे तपासण्याची गरज आहे.

'अल-शबाब'कडे मनुष्यबळ, आर्थिक स्रोत आणि सोमालियातील काही भागांमध्ये प्रभाव आहे; परंतु आधुनिक लष्करी तंत्रज्ञान, अचूक लक्ष्यभेदी क्षमता, ड्रोनविरोधी साधने, प्रगत संप्रेषण व्यवस्था आणि आधुनिक शस्त्रास्त्रे यांची त्याला सातत्याने गरज भासते. दुसरीकडे, हुतींनी गेल्या काही वर्षांमध्ये क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि इतर आधुनिक लष्करी साधनांचा वापर करून आपली क्षमता लक्षणीयरीत्या वाढवली आहे. येमेनमधील संघर्षामुळे तयार झालेल्या शस्त्रांच्या बाजारपेठा, तस्करीचे मार्ग आणि मध्यस्थांचे जाळे या परिस्थितीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. अशा परिस्थितीत एखादा मध्यस्थ दोन्ही बाजूंच्या गरजा जोडत असेल, तर त्यातून निर्माण होणारे नेटवर्क एखाद्या औपचारिक संघटनेपेक्षा अधिक धोकादायक ठरू शकते. कारण त्याला एका ठरावीक कराराची किंवा संयुक्त नेतृत्वाची आवश्यकता नसते.

पैसा, शस्त्रे आणि माहिती यांची देवाणघेवाण करणारे छोटे-छोटे घटक स्वतंत्रपणे काम करू शकतात. हीच बाब सुरक्षा यंत्रणांसाठी आव्हानात्मक आहे. दहशतवादी नेटवर्कची पारंपरिक कल्पना म्हणजे एका संघटनेचे नेतृत्व, त्याखालील सदस्य आणि त्यांच्यातील स्पष्ट आदेशसाखळी; परंतु आधुनिक काळातील दहशतवाद अधिक विकेंद्रित होत आहे. शस्त्रतस्कर, स्थानिक गुन्हेगारी टोळ्या, बनावट कंपन्या, समुद्री तस्करीचे मार्ग आणि डिजिटल आर्थिक व्यवहार यांचा वापर करून विविध संघटना एकमेकांशी जोडल्या जाऊ शकतात. या प्रकरणाचे गांभीर्य समजून घेण्यासाठी लाल समुद्र आणि एडनच्या आखाताचे सामरिक महत्त्व लक्षात घ्यावे लागेल.

युरोप आणि आशियामधील समुद्री व्यापारासाठी हा प्रदेश अत्यंत महत्त्वाचा आहे. सुएझ कालवा, बाब-अल-मंदेब सामुद्रधुनी आणि एडनचे आखात हे जागतिक व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचे मार्ग आहेत. येमेनच्या किनाऱ्यावर हुतींचा प्रभाव आणि सोमालियाच्या किनाऱ्यावर 'अल-शबाब'ची उपस्थिती यामुळे या संपूर्ण समुद्री पट्ट्यात अस्थिरतेची अनेक केंद्रे आधीपासून अस्तित्वात आहेत.

त्यात शस्त्रतस्करी, दहशतवादी संपर्क आणि समुद्री नेटवर्क यांची भर पडली, तर परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होऊ शकते. याचा परिणाम केवळ स्थानिक सुरक्षेवर होणार नाही. व्यापारी जहाजांना वाढता धोका निर्माण झाल्यास विमा खर्च वाढतो, जहाजांना पर्यायी मार्ग स्वीकारावे लागतात आणि वाहतूक खर्च वाढतो. परिणामी, जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे लाल समुद्रातील दहशतवादी अस्थिरता ही शेवटी जागतिक अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचणारी समस्या आहे. येमेन आणि सोमालिया यांच्यामधील समुद्री परिसराचा वापर तस्करीसाठी होण्याची शक्यता नवी नाही. या भागात शस्त्रे, अमली पदार्थ, मानवी तस्करी आणि इतर बेकायदेशीर व्यापाराचे मार्ग पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. दहशतवादी संघटनांना या मार्गांचा उपयोग मिळाला, तर केवळ शस्त्रेच नव्हे, तर पैसा, माहिती आणि मनुष्यबळाची वाहतूक करण्याचीही संधी मिळू शकते. यामुळे समुद्री सुरक्षेचा प्रश्न अधिक व्यापकपणे पाहण्याची गरज आहे.

या प्रश्नावर उत्तर शोधताना केवळ युद्धनौका तैनात करून समस्या सुटणार नाही. बंदरांवर देखरेख, संशयास्पद आर्थिक व्यवहारांचे परीक्षण, जहाजांच्या हालचालींचे निरीक्षण, किनारपट्टीवरील स्थानिक यंत्रणांशी समन्वय आणि आंतरराष्ट्रीय गुप्तचर सहकार्य यांना समान महत्त्व द्यावे लागेल.

या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची सावधगिरी आवश्यक आहे. हुती आणि 'अल-कायदा' यांच्यातील संबंधांकडे पाहताना त्यांच्यातील वैचारिक संघर्ष दुर्लक्षित करता कामा नये. केवळ काही शस्त्रव्यवहार किंवा मध्यस्थांमधील संपर्क आढळला म्हणून दोन्ही संघटनांनी औपचारिक युती केली आहे, असे म्हणणे अचूक ठरणार नाही; परंतु याउलट होणारी चूकही टाळली पाहिजे. वैचारिक मतभेद आहेत म्हणून कोणतेही व्यवहार्य सहकार्य होणारच नाही, असे मानणेही धोकादायक आहे. दहशतवादी संघटना आपल्या अस्तित्वासाठी आणि क्षमतेसाठी आवश्यक असलेले संसाधन मिळवताना अनेकदा तात्कालिक तडजोडी करतात. त्यामुळे प्रश्न 'युती झाली आहे का?' एवढाच नसून 'कोणत्या पातळीवर, कोणत्या माध्यमातून आणि कोणत्या उद्देशाने संपर्क होत आहे?' हा असायला हवा. लाल समुद्र आणि एडनचे आखात भारतासाठी विशेष महत्त्वाचे आहेत. भारताचा मोठा परदेशी व्यापार समुद्री मार्गांवर अवलंबून आहे. पश्चिम आशिया, आफ्रिका आणि युरोपशी जोडणाऱ्या समुद्री मार्गांमध्ये या प्रदेशाचे स्थान महत्त्वाचे आहे. भारतीय जहाजवाहतूक, ऊर्जा आयात, निर्यातदार आणि परदेशात काम करणाऱ्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही या परिसरातील स्थैर्य आवश्यक आहे.

या पृष्ठभूमीवर भारताने या घडामोडीकडे केवळ पश्चिम आशियातील संघर्षाच्या चौकटीत न पाहता हिंद महासागराच्या व्यापक सुरक्षेच्या संदर्भात पाहणे आवश्यक आहे. समुद्री गुप्तचर व्यवस्था अधिक सक्षम करणे, मित्रदेशांशी माहितीची देवाणघेवाण वाढवणे आणि पूर्व आफ्रिका-लाल समुद्र क्षेत्रातील सुरक्षा सहकार्य मजबूत करणे ही काळाची गरज आहे. विशेषतः दहशतवादी नेटवर्क आणि समुद्री गुन्हेगारी नेटवर्क यांच्यातील संभाव्य संबंधांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेली शस्त्रांची उपलब्धता आणि संस्थात्मक पोकळी दहशतवादी नेटवर्कसाठी पोषक वातावरण तयार करते. त्यामुळे संघर्षाचे राजकीय समाधान आणि प्रादेशिक स्थैर्य हे दहशतवादविरोधी धोरणाचा अविभाज्य भाग असले पाहिजे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# पेपरफुटीने विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात

महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही राज्यातील अत्यंत महत्त्वाची घटनात्मक संस्था आहे. राज्य प्रशासनासाठी अधिकारी निवडण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून होते. त्यामुळे या परीक्षेची विश्वासार्हता म्हणजे केवळ एका संस्थेची प्रतिष्ठा नव्हे ती राज्याच्या प्रशासनाच्या गुणवत्तेशी जोडलेली बाब आहे. औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीच्या आरोपानंतर पुण्यात व कोल्हापुरात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलन केले. महाराष्ट्रात गेल्या वर्षभरात विविध भरती व पात्रता परीक्षांमध्ये झालेले गैरप्रकार, पेपरफुटीचे आरोप, परीक्षांतील त्रुटी आणि त्यानंतर विद्यार्थी आंदोलने यामुळे एक गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. परीक्षा यंत्रणा विद्यार्थ्यांची परीक्षा घेत आहे की काय, हा खरा प्रश्न आहे. आज एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीने राज्याला धक्का बसला आहे. या प्रकरणात तपास पुढे जात असून अटकसत्रही झाले आहे. काही संशयितांमध्ये आयोगाशी संबंधित व्यक्तींचाही समावेश असल्याचे तपासातून समोर आले आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ बाहेरच्या दलालांचा आहे की परीक्षा व्यवस्थेच्या आतील काही दुवेही त्यात सहभागी आहेत हा प्रश्न तपास यंत्रणांनी शेवटापर्यंत नेणे आवश्यक आहे.

प्रश्नपत्रिका छपाईपासून ती परीक्षार्थींच्या हातात पोहोचेपर्यंत अनेक टप्पे असतात. प्रश्ननिर्मिती, प्रश्नपत्रिकेची निवड, छपाई, पॅकिंग, वाहतूक, सुरक्षित साठवण, परीक्षा केंद्रांवर वितरण आणि परीक्षा सुरू होईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर गोपनीयता आणि सुरक्षा अत्यावश्यक आहे. यापैकी एका टप्प्यावरही गैरप्रकार झाला तर संपूर्ण परीक्षा धोक्यात येऊ शकते. प्रश्नपत्रिका फुटते तेव्हा केवळ एक परीक्षा रद्द होत नाही तर एका पिढीच्या कष्टांवरील विश्वासाला तडा जातो. स्पर्धा परीक्षा म्हणजे लाखो तरुणांच्या आयुष्याचे प्रवेशद्वार असते. एखाद्या सरकारी नोकरीसाठी एखादा तरुण दोन-तीन वर्षे अभ्यास करतो.



गावाकडच्या छोट्याशा घरात राहून, शेतमजुरी किंवा छोटी-मोठी कामे करून, आई-वडिलांच्या कष्टाच्या पैशातून पुस्तके घेतो, शिकवणी वर्ग लावतो, ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शहरात येऊन खोली भाड्याने घेतो. अभ्यासिकेमध्ये पैसे भरून दहा-बारा तास अभ्यास करतो. काही जण तर नोकरी, संसार आणि जबाबदाऱ्या सांभाळून स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. त्यांच्या या कष्टाचे अंतिम मूल्यमापन काही तासांच्या परीक्षेत होते. मात्र त्या परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका काहींच्या हातात पोहोचली तर मग परीक्षागृहात बसलेला प्रामाणिक विद्यार्थी आणि प्रश्नपत्रिका आधीच मिळवून बसलेला विद्यार्थी यांच्यात स्पर्धा कशी राहणार? ही स्पर्धा राहत नाही. हा शिक्षण व्यवस्थेचा पराभव असतो. प्रश्नपत्रिका फुटणे म्हणजे मेहनती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर केलेला संघटित हल्ला असतो. 'नीट'च्या पेपरफूट प्रकरणात एका शिकवणी वर्गाच्या प्रमुखाचा मुलगा परीक्षा देत असल्याने हा पेपर परीक्षेपूर्वीच लाखो रुपये देऊन विकत घेणाऱ्यांच्या हातात पडला. परिणामी परीक्षा रद्द झाली. मेहनत करून जिद्द, चिकाटीने स्वाभिमान जागृत ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. या घटनेनंतर पुन्हा एकदा राज्यभरातील एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या संतापाचा आक्रोश झाला आहे. आज हा आक्रोश पुण्यापासून कोल्हापूरपर्यंत दिसून येत आहे. पुण्यामध्ये हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. हजारो विद्यार्थ्यांनी एकत्र येत ११ मागण्या सरकारसमोर ठेवल्या आहेत. स्पर्धा परीक्षा अतिशय पारदर्शी पद्धतीने पार पाडण्यासाठी सरकार सातत्याने काम करते आहे. ही प्रक्रिया अधिक कशी मजबूत करता येईल यासाठी राज्यस्तरावर एक उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. पेपरफुटीविरोधातील आंदोलनांमध्ये अनेक संघटना सहभागी झाल्या आहेत. त्यांनी त्याविरुद्ध आवाज उठवला आहे. कोणती संघटना कोणत्या विचारसरणीची आहे, यापेक्षा तिने उपस्थित केलेल्या प्रश्नाची सत्यता काय आहे, हे तपासणे महत्त्वाचे आहे. पेपरफुटीने अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जात आहे. पेपरफुटीच्या घटनांना वेळी आळा घालणे आणि परीक्षार्थींचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास दृढ करणे आवश्यक आहे. ■

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# लघुउद्योगांची चौकट विस्तारताना

**दत्तात्रेय आंबुलकर**

नुकत्याच संपलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सुरुवातीपासून अगदी अधिवेशन संपेपर्यंत विरोधी पक्षांनी गोंधळ घातला. त्यामुळे याच गोंधळाच्या पृष्ठभूमीवर, काही पारित झालेल्या विधेयकांकडे दुर्लक्ष झाले. यापैकी एक म्हणजेच एमएसएमई (विकास) विधेयक २०२६ होय!

विरोधकांच्या गोंधळाचा फटका या पारित झालेल्या महत्त्वपूर्ण विधेयकालाही बसला आणि त्याकडे स्वाभाविकपणेच दुर्लक्ष झाले. २००६ मध्ये पारित झालेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास कायद्याच्या अंमलबजावणीला यंदा २० वर्षे पूर्ण झालीत. या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारच्या पुढाकाराने, पारित झालेल्या एमएसएमई कायद्यातील नव्या तरतुदींचे महत्त्व अधिकच वाढते.

या साऱ्या वैधानिक प्रक्रियेची व्यावसायिक पृष्ठभूमी म्हणजे, गेल्या दोन दशकांमध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग आणि उद्योजकांमध्ये मोठे बदल घडून आले आहेत. त्याचाच प्रत्यय आज सर्वदूर येत आहे. एमएसएमई क्षेत्रात आजवरच्या बदलांचे परिणाम म्हणजे, एप्रिल २०२३ मध्ये उद्यम नोंदणीअंतर्गत एमएसएमई उद्योगांची संख्या १.६५ कोटींवरून, एप्रिल २०२६ मध्ये ९.१६ कोटींवर गेली. या लघु उद्योगांच्या माध्यमातूनच, देशात सुमारे ४० कोटी रोजगार उपलब्ध झाले असून, त्याचे प्रमाण सातत्याने वाढतेच आहे. याचेच सकारात्मक परिणामही एकूणच अर्थव्यवस्थेवर दिसून येत आहेत. या बदलत्या पृष्ठभूमीवर सरकारने एमएसएमई क्षेत्रातील लघुउद्योगांच्या कार्यप्रणालीत सुधारणांसाठी आणि सुलभीकरणासाठी, यावेळी खालील सुधारणा केल्या आहेत :

**व्यावसायिक परिस्थितीनुसार लघुउद्योगांना चालना देणे :** नव्या नियमानुसार एमएसएमई क्षेत्रातील उद्योग-व्यवसायाचे वर्गीकरण आता, कारखान्यातील मशिनरीसाठीची गुंतवणूक व उलाढाल या निकषांवर करण्यावर भर असणार आहे. याशिवाय, उद्यम प्रणालीअंतर्गत एमएसएमईची संगणकीय नोंदणीही ऐच्छिक व निःशुल्क राहणार आहे.

**एमएसएमईची देयके व रक्कम वेळेत मिळण्यासाठी प्रभावी यंत्रणा व पद्धती :** या नव्या प्रणालीअंतर्गत, एमएसएमई उद्योगांना, त्यांच्या देयकासंबंधीचे वाद संगणकीय पद्धतीने सोडवून घेण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे लघुउद्योजकांच्या वेळ आणि पैशाची बचत होणार आहे. याशिवाय, देयकाच्या रकमेशी संबंधित विवाद सहा महिन्यांहून अधिक काळासाठी प्रलंबित असल्यास, विवादित रकमेच्या अर्धी रक्कम संबंधित न्यायासन देऊ शकेल, अशी तरतूदही करण्यात आली आहे.

**प्रलंबित विवादित देयकांची प्रकरणे तातडीने निकाली काढणे :** सार्वजनिक क्षेत्रातील सर्व आस्थापनांना, त्यांच्या देयक प्रक्रियेसाठी एमएसएमई उद्योगांसाठी ट्रेड रिसिव्हेबल्स डिस्काऊंटिंग सिस्टम प्लॅटफॉर्म (ट्रेड्स) पद्धतीचा वापर अनिवार्य करण्यात आला. राज्य सरकारांनीही याचाच वापर राज्यस्तरीय सार्वजनिक उद्योगांसाठी तरतूद नव्या कायद्यात आहे. उपलब्ध माहितीनुसार, एमएसएमई क्षेत्रात ट्रेड्सद्वारा, २०२२-२३ मध्ये ४० हजार कोटी रुपयांची देयके देण्यात आली. ही उलाढाल २०२५-२६ मध्ये ३.४७ लाख कोटींवर पोहोचली आहे.

**राज्यस्तरावर एमएसएमई समन्वय मंडळांची निर्मिती करणे :** कायद्यातील नवीन तरतुदींनुसार, नव्याने लवचीक व व्यवसायपूरक अशा एमएसएमई क्षेत्रातील उद्योगांत समन्वय साधण्याचे काम करण्यासाठी, मायक्रो अ‍ॅण्ड स्मॉल एंटरप्राईज फॅलिसिटेशन सेंटर (एमएसईएफसी)ची स्थापना करण्यासाठी राज्यांनी पुढाकार घ्यावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. यामुळे एमएसएमई क्षेत्रातील उद्योग व उद्योजकांचे प्रश्न जलद मार्गी लागतील अशी अपेक्षा आहे. या समन्वय केंद्राच्या कार्यकक्षेत एमएसएमई उद्योगांची प्रलंबित देयके व त्याच्याशी संबंधित मुद्यांचाही समावेश आहे. नव्या कायद्यातील राज्यस्तरीय तरतुदी अधिक उपयुक्त, परिणामकारक व एमएसएमई क्षेत्राला पूरक ठराव्यात, यासाठी राज्य सरकारांना प्रशासनिक व वैधानिक स्वायत्तताही प्रदान करण्यात आली आहे.

**एमएसएमईसाठी सुलभ आणि व्यावसायिक विश्वासाचे वातावरण प्रदान करणे :** नव्या तरतुदींनुसार, विशिष्ट तरतुदींचे पालन न झाल्यास घेण्यात येणारी कठोर भूमिका व त्यानुसार करण्यात येणाऱ्या कारवाईला सौम्य स्वरूप देण्याची भूमिका महत्त्वाची. यापूर्वी, कायदेशीर तरतुदींची पूर्तता न झाल्यास दंड व दिवाणी शिक्षेची तरतूद होती. यासंदर्भात अपेक्षित नोंदणी न होणे अथवा संबंधित माहिती विशिष्ट कालावधीत न भरण्यासारख्या प्रकारांसाठीही एमएसएमई कायद्यात दुहेरी दंडात्मक तरतुदी होत्या. यावर नव्या सुधारणांमध्ये दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

नवीन तरतुदीनुसार, एमएसएमई व लघुउद्योजकांच्या संदर्भात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ अपूर्ण वा चुकीची माहिती वा तपशील सादर केल्यास, अशा प्रकरणी पहिल्या वेळेस संबंधित लघुउद्योजकाला समज देऊन सुधारण्याची संधी दिली जाणार आहे. त्यानंतर असाच प्रकार पुन्हा आढळल्यास, अशा लघुउद्योजकावर दंडात्मक कारवाईचा बडगा उचलला जाण्याची तरतूदही करण्यात आली आहे. अशाच प्रकारच्या तरतुदींचा अवलंब लघुउद्योजकांना देय असणाऱ्या देयकांची बाकी रक्कम व त्यावरील देय व्याजाचे तपशील, आपल्या वार्षिक व्यवसाय विवरणपत्रात नमूद न करणाऱ्या व्यावसायिकाला आधी समज व नंतर दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. याचाही सकारात्मक परिणाम एमएसएमईच्या आर्थिक उलाढालीवर होणे अपेक्षित आहे. या संदर्भातल्या नव्या कायदेशीर तरतुदी व धोरणात्मक निर्णयांमुळे, एमएसएमई क्षेत्रात विश्वासाची भावना वाढीस लागेल. तसेच, लघुउद्योग क्षेत्रातील वाढता व्यवसाय लक्षात घेता, या उद्योग क्षेत्राशी संबंधित सर्व उद्योगांमध्ये परस्पर सहकार्यही वाढण्याचा विश्वास यानिमित्ताने सरकारतर्फे व्यक्तकरण्यात आला आहे. ■

९८२२८४७८८६

(लेखक एचआर व्यवस्थापक आणि सल्लागार आहेत.)

## वाचक पत्रे

### सहजीवनाची आवश्यकता

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सर्वसमावेशक आणि लवचीक आहे. भेदविरहित, एकसंध व चारित्र्यसंपन्न समाजरचना तयार करणे हे संघाचे ध्येय आहे. त्यासाठीच संघाने मुस्लिम राष्ट्रीय मंच यासह विविध आयाम दिले आहेत. संघ शाखेवर रोज एकात्मता स्तोत्र आणि मंत्र म्हटला जातो. त्यात जैन, बुद्ध, शीख, शैव, शिव आणि वैष्णव या सर्वांना नमन केले जाते. समरसतेशिवाय समता निर्माण होऊ शकणार नाही आणि दोन्ही नसेल तर आपण राष्ट्रीयतेची कल्पना करू शकणार नाही. कोणत्याही व्यक्तीचा परिचय झाल्यावर आपल्या मनात तो कोणत्या जाती, धर्माचा आणि वर्गाचा आहे असा विचार येणे हे खुजेपणाचे लक्षण आहे. माणसाने माणसाकडे माणूस म्हणूनच पाहिले पाहिजे.

मात्र, यातले वास्तव असे की, फक्त हिंदू समाजाला सांगून भाईचारा निर्माण होणार नाही. तर इतर सर्व समुदायांना सोबत यावे लागेल. गेल्या दोन-तीन दशकांत मतांसाठी तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे मुख्यतः समाजा-समाजात दरी निर्माण झाली आहे. सर्व प्रकारचा जिहाद सुरू आहे. शत्रुता, कटुता, अविश्वास वाढला आहे. आज खऱ्या अर्थाने 'हिंदू मुस्लिम शीख इसाई, हम सब भाई भाई' या भावनेसह सहजीवनाची आवश्यकता आहे.

राष्ट्रवादी मताचे मुसलमान आणि ख्रिश्चन यांना स्वयंसेवक आनंदाने स्वीकारतील. फक्त एका अटीवर की, त्यांनी हिंदूंचे धर्मांतरण आणि लव्ह जिहाद किंवा कोणत्याही प्रकारचा जिहाद करू नये. घर वापसीला विरोध करू नये. हे शक्य आहे की नाही हे त्यांच्या प्रतिसादावर अवलंबून आहे. सकारात्मक प्रतिसाद मिळण्यासाठी आशावादी राहून त्यांच्याशी मैत्रीपूर्ण व्यवहार ठेवून प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने कार्य करणे आवश्यक आहे.

**प्रदीप गडकरी**/९८२२४७३२२१

■■

### दहीहंडी : एक साहसी व कलात्मक उत्सव

दहीहंडी उत्सव म्हणजे एकत्र जमणाऱ्या सर्व गोविंदांचा एक सामाजिक, साहसी व कलात्मक उत्सव होय. महाराष्ट्र शासनाने दहीहंडी उत्सव शासनाच्या साहसी खेळामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय यातच या उत्सवाचे महत्त्व दिसून येते. भगवान श्रीकृष्ण यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ही सर्व गोविंदा मंडळी समाजात विधायक, रचनात्मक व श्रद्धेचा पाया रचून न्याय कार्यासाठी आपली कला, कौशल्य व साहसाचे प्रात्यक्षिक दाखवून समाजाला योग्य व सकारात्मक दिशा दर्शविण्याचे उपक्रम राबविते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या दहीहंडी उत्सवातून समाजातील विविध थरातील युवक एकत्र येतात, हे सामाजिक ऐक्याचे प्रतीक आहे. वेगवेगळ्या विचार व संप्रदायांचे युवक एकत्र येणे म्हणजे सामाजिक ऐक्याचे दर्शन होय. सामाजिक संघटितपणा दहीहंडी उपक्रमातून दिसून येतो. या दहीहंडी उपक्रमातून

गोविंदांच्या कला, कौशल्य, संयम, सहकार्य व समन्वयाचे दर्शन घडते. दहीहंडीचे मनोरे सामाजिक ऐक्याचे



प्रतीक होय. गोविंदांचा प्रचंड आत्मविश्वास बळावणारा हा उत्सव होय. अत्यंत संयमाने गोविंदा मनोरे उभारतात. एकावर एक उभे राहून हंडीपर्यंत गोविंदा पोहचतो व हंडी फोडतो. हे प्रचंड साहस व आत्मविश्वासाचे लक्षण आहे.

''एकमेका साहाय्य करू-अवघे धरू सुपंथ'' असा संदेश देणारा हा उत्सव होय. दहीहंडीतून साहस, धाडस, धीरोदात्तपणा व विश्वास यासारखे गुण जोपासले जातात. हा उपक्रम भगवान श्रीकृष्ण यांच्या सर्वगुणसंपन्नतेचा आदर व सन्मान करणारा उत्सव होय. गोविंदांनी दहीहंडी उत्सव साजरा करीत असताना आपली सर्वांची काळजी घेणे गरजेचे आहे. प्रेक्षकांनी शांतता व संयम बाळगावा. सहभागी गोविंदांनी उत्सवास साजेशी भूमिका पार पाडल्यास दहीहंडीचा आनंद द्विगुणित होतो.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

■■

### बडनेरा-नाशिक मेमू रद्द करू नये

जळगाव आणि शिरसोली दरम्यान रुळांच्या दुरुस्तीमुळे, भुसावळ रेल्वे विभागाने ८ सप्टेंबर २०२६ रोजी होणारी ६११२९/६११३० बडनेरा-नाशिक रोड-बडनेरा मेमू ट्रेन रद्द केली आहे. प्रवाशांना होणारा त्रास टाळण्यासाठी, ही मेमू ट्रेन पूर्णपणे रद्द करण्याऐवजी थोड्या अंतरावरच थांबवावी, अशी रेल्वे प्रवाशांची मागणी आहे. रेल्वे विभाग या मागणीकडे लक्ष देईल, अशी आशा आहे. ■

**राजेश कारिया**/अकोला

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# राष्ट्रीय पोषण माहमध्ये हिंगोली जिल्हा राज्यात द्वितीय

## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचेहस्ते मुंबईत गौरव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**

राष्ट्रीय पोषण माह २०२५ अंतर्गत प्रभावी कामगिरी करत हिंगोली जिल्ह्याने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला. जिल्ह्यातील एक हजार १९७ अंगणवाडी केंद्रांवर राबविलेल्या विविध उपक्रमांची पोषण माहच्या अधिकृत पोर्टलवरील जन आंदोलन डॅशबोर्डवर ऑनलाइन नोंद करण्यात आली. या कामगिरीबद्दल शुक्रवार, ११ सप्टेंबर रोजी मुंबईच्या यशवंतराव चव्हाण मुख्य सभागृहात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते हिंगोली जिल्ह्याला सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

महिला व बालकल्याण विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका-मदतनीस यांचे या यशाबद्दल कौतुक करत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत दरवर्षी सप्टेंबरमध्ये राष्ट्रीय पोषण माह साजरा केला जातो. जिल्हाधिकारी गुप्ता आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून २०२५ मध्ये अंगणवाडी केंद्रांवर लठ्ठपणावर नियंत्रण, साखर व तेलाचे सेवन कमी करणे, प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षण, पोषण भी पढाई भी, एक पेड मां के नाम, बालक व लहान मुलांसाठी पाककृती, आहार पद्धती तसेच पोषणविषयक जनजागृतीत पुरुषांचा सहभाग आदी विविध पोषणविषयक मार्गदशन, जनजागृती उपक्रम राबवून त्यांची ऑनलाइन नोंद जन आंदोलन डॅशबोर्डवर महिला व बाल कल्याण विभागाच्या वतीने घेतल्याचे जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी विजय बोराटे यांनी सांगितले.

बाल विकास प्रकल्प अधिकारी विवेक वाकडे, राजकुमार धापसे, सारिका सोरेकर, संगीता इंगळे, पुष्पा राठोड, विस्तार अधिकारी अविनाश डुकरे, अंगणवाडी पर्यवेक्षिका, जिल्हा समन्वयक शुभांगी पाटील, सहाय्यक जिल्हा समन्वयक वसीम पठाण यांच्यासह अंगणवाडी सेविका व मदतनीसांनी विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतल्याचेही ते म्हणाले.

# उपोषणकर्ते रवीकिरण वाघमारे यांची प्रकृती चिंताजनक




**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ९ सप्टेंबर**

वसमत येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषण करणारे रविकिरण वाघमारे यांची प्रकृती चिंताजनक बनली आहे. त्यांच्या शरीरातील किटोन बॉडीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून रक्ताच्या उलट्या, लघवीतून रक्तस्राव आणि सतत चक्कर येत असल्याचे उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय तपासणीत समोर आले आहे. उठून बसण्याचीही ताकद त्यांच्यात उरलेली नसल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

वसमत येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर रविकिरण वाघमारे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या दहाव्या दिवशी डॉ. संभाजी कदम यांनी त्यांच्या किटोनची तपासणी केली असता शरीरातील किटोनचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे आढळून आले. प्रकृती गंभीर होत असतानाही रविकिरण वाघमारे यांनी उपजिल्हा रुग्णालयात दाखल होऊन उपचार घेण्यास नकार दिल्याचे अधिकृत आदेशात म्हटल्याचे बोलले जात आहे. रविकिरण वाघमारे यांच्या प्रकृतीचे गांभीर्य लक्षात घेऊन उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने उपोषणस्थळी २४ तास एक वैद्यकीय अधिकारी आणि एक कक्षसेवक उपस्थित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित वैद्यकीय पथकाने वाघमारे यांची दररोज तपासणी करून त्यांच्या प्रकृतीचा अहवाल कार्यालयात सादर करावा, असे आदेश वैद्यकीय अधीक्षकांनी दिले आहेत. या आदेशाची प्रत जिल्हा शल्यचिकित्सक, उपविभागीय अधिकारी आणि वसमत शहर पोलिसांना देण्यात असल्याचे माहिती आहे. प्रकृती अधिक गंभीर झाल्यास वाघमारे यांना उपचारांसाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही पोलिस प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

उपोषणकर्त्याची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असल्यामुळे मराठा समाजबांधवांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत आहे. शासनाने मराठा आरक्षणाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

# हिंगोलीत भाजपच्या बैठकीत संघटनात्मक बांधणीवर मंथन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**




भारतीय जनता पक्षाची हिंगोली जिल्हा कार्यकारिणी बैठक नुकतीच पार पडली असून यावेळी संघटनात्मक बांधणीसह पक्षातील विविध उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. गजाननराव घुगे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबारावजी बांगर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा सौ. उज्वलाताई तांबाळे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष शशिकांत वडकुते, सुरजितसिंग ठाकूर, सुभाष लदनिया, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, सुनिताताई मुळे, खोबराजी नरवाडे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष विजय नरवाडे, नंदकिशोर खिल्लारे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, विविध मोर्चा व आघाडीचे पदाधिकारी तसेच भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संघटनात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच आगामी काळातील पक्षाच्या विविध उपक्रम व कार्यक्रमांचे नियोजन, संघटनात्मक बांधणी आणि पक्षविस्ताराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. एकजुटीने, संघटितपणे आणि जोमाने पुढे जात भाजपा संघटना अधिक मजबूत करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी संघटनात्मक बांधणी तसेच पक्षाच्या विविध उपक्रमांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



**हिंगोली– शहरातील शासकीय कर्मचारी वसाहतीच्या बाजूला जिल्हा ग्रंथालय सुरू झाले असून याठिकाणी वाचनालयात विविध पुस्तके, मुलींसाठी स्वतंत्र कक्ष, पीएचडी, संशोधकांसाठी पुस्तके उपलब्ध आहेत. भव्य ग्रंथालयामुळे वाचकांमध्ये आनंद साजरा करण्यात येत आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### वसमत येथील शासकीय अल्पसंख्यांक मुलींच्या वसतीगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू

हिंगोली– वसमत येथील शासकीय आयटीआयच्या आवारातील अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. वसमत तालुक्यात शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक समाजातील मुलींना शासनाच्या नियमानुसार या वसतिगृहात माफक शुल्क आकारून प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच प्रवेशित मुलींना शासनाकडून त्यांच्या खात्यावर आहार भत्ता जमा करण्यात येतो. वसमत तालुक्यातील विविध महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील मुलींनी व त्यांच्या पालकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शासकीय आयटीआयच्या आवारातील वसतिगृहात मुलींसाठी प्रशस्त निवास व्यवस्था तसेच आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मुलींनी वसतिगृहात प्रवेश घेऊन आपले शिक्षण पूर्ण करावे व उपलब्ध शैक्षणिक संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस. एल. कोंडावार यांनी केले आहे.

### आदिवासी युवकांचा कॉंग्रेस पक्षात प्रवेश



हिंगोली– कॉंग्रेस पक्षाचे नेते, विरोधी पक्षनेते खासदार राहुलजी गांधी यांची लोकप्रियता व तरुण युवकांच्या प्रती असलेला विशास बघून व कॉंग्रेस पक्षाच्या विचारधारेवर विशास ठेवून ग्रामीण भागातील लोहगाव, करंजाळा व देवकरवाडी येथील आदिवासी युवकांनी हिंगोली जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ.सतिश पाचपुते यांच्या नेतृत्वावर विशास ठेवून आज दिं.९ सप्टेंबर रोजी शहरातील शासकीय विश्रामगृह येथे कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. लोहगाव येथील संदीप बोडखे, आसाराम जुंबडे, ज्ञानेशर रिठ्ठे, नवनाथ बोडखे, दत्तात्रय पानबुडे, नवनाथ पानबुडे, विजय शेळके, राम अंभोरे, तुकाराम बोडखे यांनी तर करंजाळा येथील जगदिश डाखोरे, ज्ञानेशर धनवे, रमेश पांढरे यांनी व देवकरवाडी येथील हनुमान नाईक, संजय घाटे, शुभम खेडकर यांनी प्रवेश केला.


**Karnataka Bank Ltd.**
Your Family Bank. Across India.

छत्रपती संभाजीनगर शाखा

**सूचना**

खालील व्यक्तींनी सोन्याचे दागिने गहाण ठेवून कर्ज घेतले असून, आमच्या मागणी सूचना देऊनही त्यांनी रक्कम परत केलेली नाही. त्यामुळे, कृपया नोंद घ्यावी की, जर मुद्दल / व्याज आणि इतर शुल्क १२/१०/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी भरले नाहीत, तर गहाण ठेवलेल्या दागिन्यांचा लिलाव १३/१०/२०२६ रोजी कर्नाटक बँक, छत्रपती संभाजीनगर शाखेत, बँकेच्या नियमांनुसार आणि नियमावलीनुसार, सायंकाळी ४.०० वाजता बँकेच्या आवारात केला जाईल. बँक कोणतीही पूर्वसूचना न देता आणि त्याची कारणे नमूद करून, लिलाव रद्द करण्याचा किंवा इतर कोणत्याही सोयीस्कर तारखेपर्यंत पुढे ढकलण्याचा अधिकार राखून ठेवते.

| १. | क्र. सुवर्ण कर्ज खाते क्रमांक आणि दिनांक | कर्जदाराचे नाव | दायित्व रु. |
|---|---|---|---|
| १. | ०३१७००२१००१९११०१ & १६-१२-२०२३ | चौरे अंकुश महादेव | ८९,७०६.५० |

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर / दिनांक : ०८.०९.२०२६ शाखाप्रमुख


# उगम येथे पीक व्यवस्थापन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**



उगम ग्राम विकास संस्था उमरा व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने उमरा येथे पावसाचा खंड व अपुऱ्या पावसामुळे पिकाची घ्यावयाची काळजी व उपाय योजना कशी करावी यासाठी शेतकरी व कृषी सखी महिलांना कृषी विद्यापीठ परभणी चे कृषी शास्त्रज्ञ आनंदराव गोरे यांनी सखोल मार्गदर्शन केले.

वारंगा मसाई येथून जवळच असलेले उगम ग्राम विकास संस्था उमरा या ठिकाणी आयोजित पावसाच्या खंड काळातील पीक व्यवस्थापन यासंदर्भात वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथील मुख्य शास्त्रज्ञ आनंदराव गोरे यांनी शेतकरी वर्ग व कृषी सखी यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की दीर्घकालीन व्यवस्थापन करणे, विहीर पुनर्भरण करणे, सायंकाळी पिकावर साध्या पाण्याची फवारणी करणे, रासायनिक खताचा वापर टाळून सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करणे आदी उपाययोजना सांगितल्या. तर उगमचे संचालक जयाजी पाईकराव यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले की, कॅन्सरसारखे आजार उद्भवू नये व पिकाला हानी पोहोचू नये म्हणून रासायनिक खताला तिलांजली देऊन शेणखताचा वापर करणे, पूर्व नियोजन करणे, हिंगोली जिल्ह्यात १२० कृषीसाठी कार्यरत असून त्यांच्या मार्फत शेतकऱ्यांना शेती पिका संदर्भात माहिती देण्याचे काम करणे. बैलांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे बैलपोळा साजरा करण्याऐवजी ट्रॅक्टर पोळा साजरी करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे, ही खेदाची बाब आहे असेही त्यांनी सांगितले. यावेळी नागेश सावंत, पत्रकार पंडित, सरपंच बाबुराव क्षीरसागर, कृषी सखी अंजली भोयर, किसन बर्गे यांनी पावसासंदर्भात मनोगत व्यक्त केले. यावेळी मसोड, जांभरून, उमरा हातमाली, वारंगा मसाई शिवनी, आमदरी, पिंपळदरी, कळमकोंडा, सोडेगाव येथील ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन कृषी तज्ञ राम खंदारे यांनी केले तर आभार संचालक जयाजी पाईकराव यांनी मानले.

# सहायक अभियंता, लेखाधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील नर्सी नामदेव येथील ३३ केव्ही उपकेंद्रात अतिरिक्त भार कमी करण्याकरिता ६ कि.मी. उच्च दाब वाहिनी व ११ केव्हीचे फिडर बसविण्याचे कामामध्ये मंजूर अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण न होता सुमारे रु. ५०,३७,६३८/- चे संपूर्ण देयक अदा करून शासनाच्या निधीचा अपहार, आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याच्या प्रकरणी संबंधित अधिकारी व कंत्राटदार एजन्सी यांच्याकडून अतिप्रदानाची वसुली करून सदर कंपनीवर कायदेशीर कारवाई करून तसेच या प्रकरणातील निलंबीत अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता तसेच मा.जिल्हाधिकारी हिंगोली यांच्या विना परवानगीने कार्यारंभ आदेशात बदल करून कामाची व्याप्ती कमी करत शासनाची फसवणूक करणारी सहायक अभियंता लेखाधिकारी व इतर यांनाही तात्काळ निलंबित करून विभागीय चौकशी सुरु करावी आणि यांच्यासह वरील सर्वाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवून सदर कंत्राटदार कंपनी यांना व तिचे मालक यांना काळ्या यादीत टाकत सदर प्रकरणाची आणि यापूर्वीच्या दोन वर्षाच्या कालावधीत झालेल्या मेंटेनन्सच्या विविध कामामधील तसेच निरंतर योजनेमधील सर्व कामाची, तसेच ईतर योजनेतील विविध कामांची एसआयटी मार्फत चौकशी करावी नसता याच्या निषेधार्थ प्रादेशिक कार्यालय महावितरण, छत्रपती संभाजी नगर यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु करण्यात येईल असे निवेदन संदर्भ क्र.२ दि.१४.८.२०२६ रोजी देण्यात आले होते. आजपर्यत या प्रकरणातील ईतर दोषींवर निलंबनाची कारवाई करून सर्वांविरुद्ध अपहाराचा गुन्हा नोंदवुन कारवाई करण्यात आलेली नाही. त्याच्या निषेधार्थ प्रादेशिक कार्यालय महावितरण, छत्रपती संभाजी नगर यांच्या कार्यालयासमोर दि.१७.९.२६ रोजी झेंडावंदनानंतर सामुहिक आत्मदहन आंदोलन करण्यात येईल असा इशारा विराट राष्ट्रीय लोकमंचचे संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल, नौमान नवेद यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# पोळा सणानिमित्त हिंगोलीत बाजारपेठ सजली, पूजेच्या साहित्याची खरेदी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**



बळीराजाचा सर्वात महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा सण असलेल्या 'बैल पोळा' सणानिमित्त हिंगोली शहरातील मुख्य बाजारपेठेत मोठी लगबग पाहायला मिळत आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या आपल्या सर्जा-राजाला सजवण्यासाठी लागणारे विविध साहित्य आणि पूजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी शेतकरी बांधवांनी बाजारपेठेत मोठी गर्दी केली आहे.

बैलांच्या सजावटीसाठी लागणारे रंगीबेरंगी बाशिंग, वेसण, मोरकी, रेशमी झुली, घुंगूरमाळा आणि शिंगांचे रंग खरेदी करण्यासाठी दुकानांवर शेतकऱ्यांच्या रांगा लागल्या आहेत.

घरोघरी आणि गोठ्यात होणाऱ्या पूजनासाठी लागणारे मातीचे बैल (मातीचे पोळे), झेंडूची फुले, ऊस आणि नैवेद्याच्या साहित्याची मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे.हिंगोली शहरातील मुख्य बाजारपेठ, बस स्थानक परिसर आणि प्रमुख मार्गांवर व्यापाऱ्यांनी तात्पुरती दुकाने थाटली असून खरेदी-विक्रीमुळे मोठी आर्थिक उलाढाल पाहायला मिळत आहे.

आपल्या कष्टकरी बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बांधव कोणतीही कसर सोडताना दिसत नसून, हिंगोली शहरात पोळा सणाचा उत्साह ओसंडून वाहत आहे.

# आदर्शमध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ सप्टेंबर**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि आदर्श महाविद्यालय हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिना निमित्त आयोजन करण्यात आले. यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून, विध्यर्थाना अपेक्षित शिक्षणव्यवस्था या विषयावर आपली वक्तृत्व कला सादर केली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव उपप्राचार्य प्रो. डॉ. संजीव कुमार नरवाडे संयोजक प्रो. डॉ. बस्वराज लक्षटे तर प्रमुख पाहुणे डॉ. विजय वाघ उपस्थित होते.

बदलती शिक्षण पद्धती, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, जॉब ट्रेनिंग, व्यवसायाआधारीत शिक्षण व्यवस्था, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, प्लेसमेंटच्या संधी इत्यादी विषयाची विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्वात नोंद केली.

सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक कुमारी सपना विठ्ठल केंद्रे आदर्श महाविद्यालय हिंगोली, द्वितीय क्रमांक, गायत्री शंकर काळबांडे तृतीय क्रमांक, लक्ष्मण शिवाजी ठोंबरे तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव, यांनी प्राप्त केला. सदर स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रो. डॉ. दत्ता सावंत, प्रो. डॉ. सुनील कांबळे डॉ.महेश्वर मंगनाळे, हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शैला वाघ आभार प्रदर्शन प्रो.डॉ. प्रशांत कुमार जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक मंडळींनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त...

### स्वातंत्र्यलढ्याचे आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक : प्राचार्य डॉ.मांजरे



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ९ सप्टेंबर : छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात स्वातंत्र्यलढ्याचे आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामकिशन मांजरे यांनी उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. गुंडेराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती .

यावेळी डॉ . मांजरे आपल्या मनोगतातून असे म्हणाले की, ते महाराष्ट्रातील ब्रिटिश राजवटीतील सशस्त्र लढा देणारे पहिले प्रमुख स्वातंत्र्यसैनिक होते. मराठा साम्राज्य संपुष्टात आल्यानंतर ब्रिटिशांनी रामोशी समाजाचे पारंपरिक हक्क व वतने हिरावून घेतले. याची चीड मनात ठेवून इंग्रजी राजवटीविरुद्ध त्यांनी आंदोलने उभे केले असेही याप्रसंगी मांजरे म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती समिती प्रमुख तथा मराठी विभागप्रमुख डॉ. सुरेश शिंदे यांनी केले. तर आभारप्रदर्शन सहसंयोजक डॉ. ज्ञानोबा मुळे यांनी केले.या कार्यक्रमास प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम जयंती समितीच्या वतीने घेण्यात आला

# संयुक्त पथकाकडून तात्काळ जिल्ह्यातील पीकांची पाहणी करावी आ.अभिमन्यू पवारांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी



तभा वृत्तसेवा

औसा दि. ९ सप्टेंबर : खरीप हंगाम २०२६ मध्ये लातूर जिल्ह्यात अपुरे पर्जन्यमान तसेच पावसाचे दीर्घ खंडामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.पाण्याच्या ताणामुळे पिके वाळण्यास सुरुवात झाली आहे.यामध्ये विविध रोग-किडींचा प्रादुर्भाव वाढल्याने जिल्ह्यातील सुमारे ५० ते ६० टक्के क्षेत्रावरील खरीप पिके धोक्यात आली असल्याचा दावा करण्यात आला आहे. या पार्श्र्वभूमीवर कृषी विद्यापीठातील संबंधित विषयातील तज्ज्ञ, हवामान शास्त्रज्ञ तसेच महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक नियुक्त करून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तातडीने प्रत्यक्ष पीक पाहणी करण्यात यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

आ.अभिमन्यू पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात खरीप हंगामातील सद्यस्थितीकडे गांभीर्याने लक्ष वेधले आहे.

जिल्ह्यातील पर्जन्यमानाचा तक्ता तसेच मंडळनिहाय पावसातील खंडाचा दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजीचा अहवाल पाहता अनेक भागांत पावसाचे प्रमाण अपुरे राहिले आहे.यात हवामानामुळे रोग व किडींचा प्रादुर्भावही वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.संभाव्य उत्पादनातील घट आणि प्रत्यक्ष पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करणे आवश्यक असल्याचे आ.अभिमन्यू पवार यांनी निवेदनात म्हटले आहे.

पीक नुकसानीचे अचूक व शास्त्रीय मूल्यांकन करण्यासाठी केवळ प्रशासकीय पावसात दीर्घ खंड पडल्याचे दिसून येत आहे.पावसाच्या अनियमिततेचा थेट परिणाम खरीप पिकांच्या वाढीवर झाला आहे.परिणामी काही भागांत पिके वाळण्याची स्थिती निर्माण झाली आहे.प्रतिकूल पाहणी न करता कृषी विद्यापीठातील संबंधित विषयातील तज्ज्ञ व शास्त्रज्ञ, हवामान शास्त्रज्ञ, महसूल विभाग आणि कृषी विभागातील अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक नियुक्त करण्यात यावे.अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या पथकामार्फत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष शेतांवर जाऊन पाहणी करावी. तसेच तालुकानिहाय आणि मंडळनिहाय पिकांची सद्यस्थिती, पावसाचे प्रमाण व पावसातील खंड, पिकांवरील पाण्याचा ताण, रोग-किडींचा प्रादुर्भाव, बाधित क्षेत्राचे प्रमाण आणि संभाव्य उत्पादनातील घट यांचा शास्त्रीय पद्धतीने आढावा घ्यावा, अशी मागणी आ. पवार यांनी केली आहे.

### शासनाकडे तातडीने अहवाल सादर करावा - आ.अभिमन्यू पवार

संयुक्त पथकामार्फत तालुकानिहाय व मंडळनिहाय पीक पाहणी करून पिकांचे नुकसान, बाधित क्षेत्र व संभाव्य उत्पादनातील घट याबाबत वस्तुनिष्ठ व शास्त्रीय अहवाल तयार करावा. हा अहवाल तातडीने शासनाकडे दाखल करून बाधित शेतकऱ्यांना आवश्यक मदत व नुकसानभरपाई उपलब्ध करून द्यावी. पावसातील खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची गंभीर दखल घेऊन प्रशासनाने विलंब न करता प्रत्यक्ष पाहणी व पंचनाम्याची कार्यवाही सुरू करावी.अशी मागणी आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी केली आहे.

## मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणुन तरुणाची विहीरीत उडी घेऊन आत्महत्या



तभा वृत्तसेवा

शिरुर आनंतपाळ दि. ९ सप्टेंबर : सोमठाणा मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी सुमठाणा ता. शिरुर आनंतपाळ येथील तरुणाने विहिरीत उडी मारुन आत्महत्या केली. आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव सुनिल विनायक बिरादार वय ४५ असे आहे.

मराठा समाजाचे योद्धा मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी अकराव्यांदा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आंतरवाली येथे उपोषणाला बसले आहेत. याच पार्श्र्वभूमीवर मराठा समाजाला कधी आरक्षण मिळेल या विवंचनेत सुनिल विनायक बिरादार याने ८ सप्टेंबर रोजी दुपारी दिड वाजता सुमठाणा शिवारातील बालाजी वसंतराव बिरादार यांच्या विहीरीमध्ये आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. मयत सुनिल विनायक बिरादार यांच्या पश्र्चात आई, वडील पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. दरम्यान, मृत सुनिल बिरादार यांनी लिहिलेली चिठ्ठी आढळून आली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून आरक्षणाचा काहीच उपयोग होत नाही. मनोज दादा जरांगे पाटील इतके आंदोलन करीत असूनही मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने मी आत्म हत्या करत असल्याची चिटी आढळुन आली आहे. सरकारने आरक्षणाचा प्रश्र्न लवकरात लवकर सोडवावा असा मजकूर या चिठ्ठीत लिहिलेला असुन शेवटी जय शिवराय असा उल्लेख आहे.

सुमठाणा व परिसरात आत्म हत्या केल्याचे समजताच मृत सुनिल बिरादार यांचे प्रेत घेवुन उदगीर लातुर या राज्यमार्गावर असलेल्या येरोळमोड येथे ठेवुन जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही तो पर्यंत अंत्यसंस्कार करणार नसल्याचे आंदोलकांनी चक्काजाम रस्ता रोको आंदोलन केल्याने वहाणाच्या सहा कि.मी. पर्यंत रांगा लागल्या होत्या. दरम्यान प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधिक्षक अक्षय जाधव व तहसिलदार किशोर यादव यांनी घटनास्थळी त्वरित उपस्थित होऊन आंदोलकांच्या मागण्या शासनाला कळवणार असल्याचे सांगितले.

## दत्तात्रय मिरकले पाटील यांची ग्राहक संरक्षण परिषद सदस्यपदी दुसऱ्यांदा नियुक्ती



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ९ सप्टेंबर : अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे लातूर जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील यांची जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे सदस्य म्हणून दुसऱ्यांदा तीन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात निवड समितीने त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

मिरकले पाटील हे गेल्या १२ वर्षांपासून ग्राहक चळवळीच्या माध्यमातून ग्राहकांचे प्रश्र्न, फसवणूक प्रकरणे, ग्राहक हक्क व ग्राहक संरक्षण कायदा २०१९ याबाबत जनजागृतीचे कार्य करीत आहेत. तसेच त्यांनी जिल्हा दक्षता समिती, सहकार समिती, खरेदी-विक्री संघाचे संचालक व विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे चेअरमन म्हणूनही जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

त्यांच्या ग्राहक हिताच्या कार्याची दखल घेऊन शासनाने पुन्हा ही जबाबदारी दिल्याबद्दल अखिल भारतीय ग्राहक पंचायत लातूरसह जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नियुक्तीबद्दल त्यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. महेशजी ढवळे तसेच जिल्ह्यातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## ग्रामीण रुग्णालयात डायलिसिस सेंटर तातडीने सुरू करण्याची सम्राट मित्र मंडळाची मागणी

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ९ सप्टेंबर : शहर व तालुक्यातील वाढती लोकसंख्या आणि विविध आजारांमुळे डायलिसिसची आवश्यकता असलेल्या रुग्णांची संख्या लक्षात घेता, अहमदपूर ग्रामीण रुग्णालयात डायलिसिस सेंटर तातडीने सुरू करण्यात यावे, अशी ठोस मागणी सम्राट मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने एका निवेदनाद्वारे आयोग्य उपसंचालक लातूर यांच्याकडे केली आहे.

### १७ सप्टेंबरपर्यंत कार्यवाहीची अपेक्षा

अहमदपूर ग्रामीण रुग्णालयातील डायलिसिस सेंटर सुरु करण्याबाबत दि. १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत सकारात्मक कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षाही सम्राट मित्र मंडळाने व्यक्त केली आहे. अन्यथा या प्रश्र्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पुढील भूमिका घेण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

उपसंचालक आरोग्य सेवा यांना दिलेल्या निवेदनात पूढे नमूद केले आहे की, अहमदपूर तालुक्यातील अनेक गरीब व गरजू रुग्णांना डायलिसिससाठी लातूर तसेच इतर शहरांमध्ये जावे लागते. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांवर वेळ, प्रवास आणि आर्थिक खर्चाचा मोठा भार पडतो. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या हक्काची आरोग्यसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हावी, या उद्देशाने अहमदपूर ग्रामीण रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू करण्याची मागणी या पूर्वी सूध्दा करण्यात आली होती.त्या नूसार जिल्हा शल्यचिकित्सक, लातूर यांच्यासह संबंधित प्रशासकीय यंत्रणेशी पत्रव्यवहार सूध्दा करण्यात आला होता.

दरम्यान लातूर जिल्ह्यात दोन डायलिसिस मशीन वापराविना पडून असल्याची माहिती आहे.तेंव्हा या सेंटर सुरू केल्यास अहमदपूर तालुक्यातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी डॉ. सूर्यवंशी यांनी केली आहे.

डायलिसिससारखी जीवनावश्यक आरोग्यसेवा पैशाअभावी किंवा प्रवासाच्या अडचणीमुळे कोणत्याही रुग्णाला नाकारली जाऊ नये. अहमदपूरमध्येच ही सुविधा उपलब्ध होणे हा नागरिकांचा मूलभूत आरोग्यहक्क आहे. प्रशासनाने याकडे केवळ मागणी म्हणून नव्हे, तर अत्यावश्यक सार्वजनिक आरोग्याचा प्रश्र्न म्हणून पाहावे, असे डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी म्हटले आहे.

या शिष्टमंडळात शहराध्यक्ष बजरंग गायकवाड, संतोषभाऊ पिलवटे, आकाश पवार,मोहम्मद पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

## लाल बहादुर शास्त्री विद्यालयात पर्यावरणपूरक गणपती बनवण्याची कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ९ सप्टेंबर : भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई अमृत महोत्सवी वर्ष साजरा करीत आहे. त्यानिमित्य लाल बहादुर शास्त्री विद्यालय उदगीर येथे पर्यावरण पूरक गणपती बनविणे कार्यशाळा संपन्न झाली.

याप्रसंगी माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे, अर्थसमिती सदस्य चंद्रकांत धनबा, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक वसंत वाघमारे, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, माधव मठवाले, किरण नेमट, तानाजी खोकले, अभ्यासपूरक मंडळ सहप्रमुख निलेश मांडवकर, उपक्रम प्रमुख नीता मोरे, कलाशिक्षक गुरुदत्त महामुनी हे उपस्थित होते.

कलाशिक्षक गुरुदत्त महामुनी यांच्या मार्गदर्शनात ही कार्यशाळा संपन्नझाली.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी सुमारे १०० इकोफ्रेंडली गणेश मूर्ती तयार केल्या. मार्गदर्शन करताना महामुनी म्हणाले की, बॉम्बे क्ले नावाच्या विशिष्ट मातीपासून तयार केलेले पर्यावरणपूरक गणपती पाण्यात विलीन करण्यासाठी सर्वोत्तम असतात, नैसर्गिक व प्रदूषणमुक्त असतात, मूर्ती रंगवण्यासाठी नैसर्गिक रंग वापरल्यामुळे निसर्गाला हानी पोहोचत नाही. तसेच भारतीय संस्कृतीची जोपासना तर होतेच व यातून स्वबोध जागृत होतो. विद्यार्थ्यांच्या एकतेतून समरसतेचा संदेश मिळतो असे प्रतिपादन केले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी गुरुदत्त महामुनी, नीता मोरे, निलेश मांडवकर, संदीप बोधनकर, संघप्रिया गायकवाड यांनी पुढाकार घेतला. या उपक्रमासाठी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव कार्यवाह शंकरराव लासुणे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख लक्ष्मी चव्हाण, तानाजी खोकले यांनी शुभेच्छा दिल्या.

# मारूती महाराज साखर कारखाना ३१११ रुपये दर देणार माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची २६ वी सर्वसाधारण सभा उत्साहात




तभा वृत्तसेवा

औसा दि.९ सप्टेंबर : लोकनेते विलासराव देशमुख यांचा आशीर्वाद व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने साखर कारखाना सुरू झाला.अतिशय पारदर्शक कारभार, काटकसर आर्थिक शिस्त पाळली गेल्याने कारखाना प्रगतीपथावर आहे. लवकरच जिल्हा बँकेच्या आर्थिक मदतीने डिस्टलरी प्रकल्प सुरू होणार असून यावर्षी कारखाना उसाला ३१११ रुपये देणार असल्याची माहिती राज्याचे माजी मंत्री सहकारमहर्षी कारखान्याचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख यांनी दिली.

संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्यावेळी ते बोलत होते. माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक यशवंतराव पाटील, रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख, मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड. प्रमोद जाधव जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, मारुती महाराज साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सचिन पाटील, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, मारुती महाराज साखर कारखान्याचे संचालक संचालक गणपतराव बाजुळगे, सुभाष जाधव, माजी जिल्हा उपाध्यक्ष नारायण लोखंडे, कारखान्याचे माजी उपाध्यक्ष उदयसिंह देशमुख, सचिन दाताळ, जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव, कार्यकारी संचालक सदाशिव बहीर, मिडिया समन्वयक हरीराम कुलकर्णी, बालाजी बिरादार, शामराव साळुंखे, सुभाष जाधव, रमेश वाळके, बाबासाहेब गायकवाड, भरत माळी, गोविंद सोनटक्के, विलास काळे, संतोष भोसले, अनिल पाटील, निवेदिता पाटील, शुभांगी बिराजदार हे उपस्थित होते. प्रारंभी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दीपप्रज्वलन करून सर्वसाधारण सभा सुरू झाली. यावेळी कार्यकारी संचालक सदाशिव बहीर यांनी सभेचे वाचन केले. विविध विषयांना सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली कार्यक्रमास मारुती महाराज साखर कारखान्याचे सर्व संचालक मंडळ मांजरा परिवारातील संस्थांचे पदाधिकारी जिल्हा बँक, रेणा, मांजरा, विलास, जागृती शुगरचे संचालक मंडळ ऊस उत्पादक शेतकरी सभासद हितचिंतक उपस्थित होते. कार्यक्रमांचे प्रास्ताविक कारखान्याचे उपाध्यक्ष सचिन पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन संचालक गणपतराव बाजुळगे यांनी केले

### आर्थिक शिस्त, पारदर्शकतेतून उपपदार्थ निर्मिती

साखर कारखान्यांकडे केवळ राजकीय दृष्टिकोनातून न पाहता, त्यांना रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू मानले पाहिजे. बँकांचे कर्ज वेळेवर फेडणे, एफआरपीनुसार ऊसबिले देणे आणि कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर करणे व्यवस्थापनाची मुख्य जबाबदारी आहे. साखरेच्या विक्रीतून पैसे येण्यास वेळ लागतो, त्यामुळे इथेनॉलसारख्या उपपदार्थांच्या निर्मितीवर भर द्यावा. आर्थिक शिस्त, पारदर्शकतेतून उप पदार्थाची निर्मिती आवश्यक आहे

### भागीदारीतून 'सीबीजी' प्रकल्प

कारखान्यात निर्माण होणारी मळी, प्रेसमड, वेस्टवॉश आणि शेतातील अवशेषांपासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) तयार करण्यात येणार आहे. यासाठी एका खासगी कंपनीशी भागीदारी करण्यात आली असून, संपूर्ण भांडवली गुंतवणूक तीच कंपनी करणार आहे. कारखान्यावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. उलट, कच्चा माल पुरवल्याने कारखान्याला भाडे व अतिरिक्त उत्पन्न मिळेल. तयार झालेला गॅस भविष्यात थेट पाइपलाइनला जोडण्याचीही योजना आहे.

### १०० कोटींपेक्षा अधिक नफा मिळवणारी जिल्हा बँक

शेतकऱ्यांना पाच लाख रुपये बिन व्याजही कर्ज देणारी देशात एक नंबर तर राज्यात अव्वलस्थानी लातूर जिल्हा बँक आहे.या बँकेची निवडणूक लवकरच होणार आहे.होणारी निवडणूक बँकेची नाही तर आपल्या प्रपंचाची आहे.त्यामुळे चुकीची मंडळी आली तर आपल्याला झळ पोहोचणार आहे.यामुळे सभासदांनी जागरूक राहावे असे आवाहन सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केले.

### मांजरा परिवाराने लातूर पॅटर्न निर्माण केला -धीरज देशमुख

सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्त्वाखाली अतिशय पारदर्शक कारभार करून शेतर्कयांना अतिशय चांगला दर दिला आहे.अधिकाधिक हारवेस्टरने उसाची तोडणी करून वजनात होणारी घट कमी होत असून गाळप व रिकव्हरीत उच्चांक होत आहे.यातून मांजरा परिवाराने देशात लातूर पॅटर्न निर्माण केला आहे.

# दुष्काळ जाहीर करा उबाठा शिवसेनेची मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ९ सप्टेंबर : निलंगा विधानसभा मतदारसंघातील निलंगा, देवणी आणि शिरूर अनंतपाळ तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने शेतीसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे तीनही तालुक्यात शासनाने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत देण्यात यावी अशी मागणी उबाठा शिवसेनेच्या वतीने निलंगा येथील उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनात लातूर जिल्ह्यातील प्रमुख विकासकामांसह निलंगा विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्र्न मांडण्यात आले आहेत .

शासनाने घोषणा केलेली किती कामे पूर्ण झाली, किती कामे सुरू आहेत आणि किती कामे अद्याप रखडली आहेत याचा वस्तुस्थितीदर्शक हिशोब जनतेसमोर मांडावे, निलंगा विधानसभा मतदारसंघातील

निलंगा, देवणी आणि शिरूर अनंतपाळ तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने शेतातील पिके सुकून जात आहे. शेतकऱ्याचा खरीप हंगामाचा खर्च वाया जाण्याची वेळ आल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले असून शासनाने तीनही तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत देण्यात यावी, तसेच जनावरांसाठी चारा छावण्या उभारण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय शेतकऱ्यांना सरसकट पीक विमा देण्यात यावा, शेतकऱ्यांचे थकीत ऊस बिल तात्काळ देण्यात यावे, शेतकऱ्यांना दिवसाला १२ तास वीजपुरवठा करण्यात यावा आणि १०० टक्के अनुदानावर शेती अवजारे उपलब्ध करून द्यावीत , मनरेगाच्या माध्यमातून झालेल्या कामांची गेल्या चार वर्षांपासून रखडलेली रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावी, घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत द्या, स्मार्ट वीज मीटरची सक्ती तात्काळ थांबवावी, रोजगार आणि उद्योगांसाठी एमआयडीसीला गती द्या,

नियोजित कोल्हापुरी बंधारे पूर्ण करावेत, निलंगा येथे १०० खाटांचे रुग्णालय मंजूर करावे, तसेच औराद शहाजानी येथील ग्रामीण रुग्णालयाची इमारत सुमारे दहा वर्षांपासून अपूर्ण असल्याने तिचे काम तातडीने पूर्ण करावे आणि आवश्यक आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी आदी मागण्या निवेदनात करण्यात आले आहे. निलंगा विधानसभा मतदारसंघातील मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

यावेळी तालुका प्रमुख अविनाश रेशमे, भागवत वंगे, मुकेश सुडे, डॉ. शोभाताई बेंजरगे, बजरंग दादा जाधव, अमोल ढोरशिंगे, शिवाजी चव्हाण, सुनिल नाईकवाडे, सचिन पवार , लखन बोंडगे, प्रा अण्णासाहेब मिरगाळे, वाघे संजय, जोहर वजीर, प्रदीप पाटील, ड. प्रवीण भोसले, मुकेश सुळे, प्रताप बंडगर, विशाल बाबरे, अरुणाताई माने, नागीण ताई सुरवसे, पार्वतीताई यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



कृषी व्यवस्थापन

# कपाशीवरील रसशोषक किडींचे व्यवस्थापन करा

कपाशी हे खरीप हंगामातील महत्त्वाचे नगदी पीक आहे. सद्यस्थितीत अधूनमधून ढगाळ व कोरडे वातावरण तसेच तापमानात वाढ झाली असल्यामुळे कपाशी पिकावर रसशोषक किडींच्या संख्येत वाढ होताना तसेच प्रादुर्भाव दिसून येत आहे. सद्यस्थितीत कापूस पिकावर प्रामुख्याने मावा, तुडतुडे, फुलकिडे इ. रसशोषक किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. म्हणून शेतकरी बांधवांनी जागरूक राहून पिकाचे निरीक्षण करून किडींचे एकात्मिक व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

**रसशोषक किडी**

**मावा** : मावा पिवळसर किंवा फिकट हिरव्या रंगाचा असतो. मावा कोवळ्या डहाळीवर किंवा पानाच्या खालच्या बाजूस समूहाने राहून त्यातील रस शोषतो. मावा किडीचा प्रादुर्भाव अधिक झाल्यास पाने कोकडतात आणि झाडाची वाढ खुंटते.

**तुडतुडे** : तुडतुडे फिकट हिरव्या रंगाचे, पाचरीच्या आकाराचे असून, ते नेहमी लांबीला तिरके चालतात. प्रौढ व पिल्ले पानाच्या खालच्या बाजूस उपस्थित राहून पानातील रस शोषतात. त्यामुळे पाने प्रथम कडेने पिवळसर होऊन नंतर तपकिरी रंगाची होतात. जास्त प्रादुर्भाव झाल्यास संपूर्ण पाने लाल-तांबडी होऊन त्यांच्या कडा मुरगळतात. परिणामी झाडांची वाढ खुंटते, झाडांना पात्या, फुले व बोंडे कमी प्रमाणात लागतात.



**फुलकिडे** : फुलकिडे आकाराने लहान व लांबट असून रंगाने फिकट पिवळसर किंवा तपकिरी रंगाचे असतात. प्रौढ व पिल्ले कपाशीची पाने आणि हिरवी बोंडे खरडून त्यातून निघणारा रस शोषतात. त्यामुळे पानावर प्रथम पांढुरके चट्टे व नंतर तपकिरी ठिपके आढळून येतात.

**पांढरी माशी** : प्रौढ व पिल्ले पानाच्या खालच्या बाजूस एका ठिकाणी उपस्थित राहून पानातील रस शोषतात, त्यामुळे पाने कोमेजतात. तीव्र स्वरूपाचा प्रादुर्भाव झाल्यास पाने लालसर, ठिसूळ होऊन वाळतात. झाडाची वाढ खुंटते आणि त्याचा उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो.

**किडींची आर्थिक नुकसानीची पातळी**

सरासरी १० मावा कीटक प्रति पान किंवा १५ ते २० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे, सरासरी २ ते ३ तुडतुडे प्रति पान, सरासरी १० फुलकिडे प्रति पान, सरासरी ८ ते १० प्रौढ माश्या किंवा २० पिल्ले प्रति पान आढळल्यास व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. सर्व रसशोषक किडी एकत्र मिळून (मावा, तुडतुडे, फुलकिडे) सरासरी १० किडी प्रति पान आढळल्यास किडींचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

**व्यवस्थापनाचे उपाय**

शिफारशीपेक्षा नत्र खताचा वापर टाळावा. पिवळे, निळे चिकट सापळे शेतामध्ये लावावेत. रसशोषक किडींवर उपजीविका करणारे मित्रकीटक उदा. सिरिफड माशी, कातीन, ढालकिडे, क्रायसोपा, ॲनॅयसीस प्रजातीचे परोपजीवी कीटक इ. संख्या पुरेशी आढळून आल्यास रासायनिक कीटकनाशकांचा वापर टाळावा.


पाच टक्के निंबोळी अर्क किंवा अझॅंडीरेक्टिन ३०० पीपीएम निमतेल बेस डब्ल्यू.एस.सी. ५० मिली किंवा अझॅंडीरेक्टिन ५ टक्के ५ मिली किंवा व्हर्टिसिलियम लेकॅनी ५० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

वरील सर्व उपाय करून किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्यास ॲसीटामिप्रिड २० टक्के एस.पी. १ ग्रॅम किंवा बुप्रोजीन २५ टक्के प्रवाही २० मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ टक्के प्रवाही ३० मिली किंवा थायामेथोक्झाम २५ टक्के डब्ल्यू.जी. २ ग्रॅम किंवा फ्लोनिकामाइड ५० टक्के डब्ल्यू.जी. ३ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही २ मि.ली. किंवा डायेंथ्युरॉन ४७ टक्के + बायेन्थ्रीन ९.४ टक्के १२.५ मिली किंवा डायेंथ्युरॉन 48 टक्के+फ्लोनिकामाइड ८ टक्के डब्ल्यू.जी. ३ ग्रॅम किंवा +बायेन्थ्रीन ८ टक्के + क्लोथियानीडीन १० टक्के एस.सी. १० मिली यापैकी कुठल्याही एका कीटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. दुसरी फवारणी करताना कीटकनाशक बदलून फवारणी करावी. ●●●

**- डॉ. नीलेश वझीरे,**
**- डॉ. जीवन कतोरे**
कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा, वर्धा

---

सप्टेंबरमध्ये खरीप पिकांचे व्यवस्थापन



# कीड-रोग नियंत्रण आणि हवामान-स्मार्ट शेती

कृषी नियोजन

सप्टेंबर महिना हा महाराष्ट्रातील खरीप हंगामासाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. कापूस, सोयाबीन, तूर, मका, मूग आणि उडीद यासारखी पिके सध्या वाढीच्या, फुलोरा किंवा शेंगा-बोंडधारणेच्या अवस्थेत आहेत. त्यामुळे या काळातील पाऊस, तापमान, जमिनीतील ओलावा, पोषण व्यवस्थापन आणि कीड-रोगांचा प्रादुर्भाव यांचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. बदलत्या हवामानाच्या पृष्ठभूमीवर सप्टेंबरमध्ये शेतकयांनी पारंपरिक पद्धतीऐवजी एकात्मिक कीड व्यवस्थापन, हवामानावर आधारित निर्णय आणि गरजेनुसार फवारणी यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

**कापसात रसशोषक किडी आणि गुलाबी बोंडअळीवर लक्ष**

सप्टेंबरमध्ये कापूस पीक फुलोरा व बोंडधारणेच्या महत्त्वाच्या अवस्थेत असते. या काळात तुडतुडे, मावा, पांढरी माशी आणि फुलकिडे यांसारख्या रसशोषक किडींचे निरीक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावाची शक्यता लक्षात घेऊन नियमित पाहणी करावी. फेरोमोन ट्रॅपचा वापर, बाधित बोंडांचे व्यवस्थापन आणि आवश्यकतेनुसार शिफारशीत कीडनियंत्रण उपाय यांचा अवलंब करावा.

**सोयाबीनमध्ये नियमित निरीक्षण महत्त्वाचे**

विदर्भ आणि मराठवाड्यातील सोयाबीन पिकात सप्टेंबरमध्ये पाने खाणाऱ्या अळ्या, खोडमाशी, चक्रीभुंगा तसेच शेंगा पोखरणाऱ्या किडींचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. मात्र कीड दिसली म्हणजे त्वरित फवारणी ही पद्धत टाळावी. किडीची योग्य ओळख, प्रादुर्भावाचे प्रमाण आणि आर्थिक नुकसान पातळी लक्षात घेऊनच नियंत्रणाचा निर्णय घ्यावा.

**कॅलेंडर फवारणीऐवजी गरजेनुसार फवारणी**

शेतकऱ्यांनी ठराविक दिवसांनी कीटकनाशक फवारण्याऐवजी

क्रॉप स्टेज + पेस्ट मॉनिटरींग + इटीएल + व्हेदरोरकास्ट

या चार बाबींवर आधारित निर्णय घेणे अधिक फायदेशीर ठरू शकते. एकाच गटातील कीटकनाशकांची वारंवार फवारणी टाळावी. त्यामुळे उत्पादन खर्च कमी करण्याबरोबरच कीटकांमध्ये रासायनिक प्रतिकारशक्ती निर्माण होण्याचा धोका कमी करण्यास मदत होते.

**हवामान अंदाजाचा शेतीत वापर वाढवणे गरजेचे**

सप्टेंबरमध्ये पावसाचे वितरण अनिश्चित असू शकते. त्यामुळे भारतीय हवामान विभागाच्या हवामान अंदाजाचा वापर करून फवारणी, खत व्यवस्थापन आणि सिंचनाचे नियोजन करावे. पावसाची शक्यता असल्यास फवारणी पुढे ढकलावी. जोरदार पावसानंतर लगेच फवारणी करण्याची घाई करू नये. वीजांच्या कडकडाटाच्या वेळी शेतात जाणे किंवा फवारणी करणे टाळावे.

**पोषण व्यवस्थापनातही अचूकता आवश्यक**

जमिनीत पुरेसा ओलावा नसताना वरखत देणे टाळावे. पिकाची अवस्था, जमिनीतील ओलावा आणि पिकाची गरज लक्षात घेऊनच खतांचा वापर करावा. शक्य असल्यास माती परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन करणे अधिक योग्य आहे. यामुळे अनावश्यक खत खर्च कमी होऊन पिकाला आवश्यक पोषकद्रव्यांचा कार्यक्षम वापर करता येतो.

**ड्रोन आणि डिजिटल शेतीचा योग्य वापर**

ड्रोन फवारणी, रिमोट सेन्सिंग, डिजिटल हवामान सल्ला आणि प्रिसीजन अॅग्रीकल्चर यांचा वापर वाढत आहे. मात्र ड्रोन हे फक्त फवारणीचे साधन आहे; योग्य कीड ओळख आणि योग्य औषध निवडणे अधिक महत्त्वाचे आहे. ड्रोनद्वारे फवारणी करताना संबंधित उत्पादनाच्या अधिकृत लेबलवरील सूचना, पीक-किडीची नोंदणी, हवामान आणि सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

**शेतकऱ्यांसाठी सप्टेंबरचा मंत्र**

सप्टेंबरमध्ये प्रत्येक शेतकऱ्याने आठवड्यातून किमान दोनदा पीक निरीक्षण करावे. किडीची ओळख केल्याशिवाय फवारणी करू नये, हवामान अंदाज पाहून फवारणीचे नियोजन करावे, अनावश्यक मिश्र फवारणी टाळावी आणि शक्य तिथे जैविक व यांत्रिक नियंत्रण पद्धतींचा वापर करावा.जास्त फवारणी नव्हे, तर अचूक फवारणी; जास्त खर्च नव्हे, तर गरजेनुसार खर्च हीच सप्टेंबरमधील आधुनिक शेतीची दिशा आहे. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची अवस्था, स्थानिक हवामान आणि प्रत्यक्ष कीड-रोगाची परिस्थिती लक्षात घेऊन निर्णय घ्यावा. संशयास्पद प्रादुर्भाव आढळल्यास कृषी विभाग, कृषी विद्यापीठ किंवा जवळच्या कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. ●●●

**- निखिल यादव,**
मएससी ॲग्री.

---

कृषी व्यवसाय

**कुक्कुट पालन हा केवळ कोंबड्या पाळण्याचा व्यवसाय नाही, तर आनुवंशिकता, पोषण, आरोग्य, व्यवस्थापन, अर्थकारण आणि बाजारपेठ यांचा समन्वय असलेला शास्त्रीय व्यवसाय आहे.**

# कुक्कुट व्यवसायाविषयी गैरसमज तथ्य जाणून घेणे आवश्यक

कुक्कुटपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. लेयर पक्ष्यांपासून अंडी, तर ब्रॉयलर पक्ष्यांपासून मांस उत्पादन केले जाते. याशिवाय देशी व सुधारित देशी कोंबड्या, बटेर, टर्की, बदक आणि गिनी फाउल यासारख्या विविध पक्ष्यांचे पालनही केले जाते. प्रत्येक प्रकारच्या पक्ष्याची उत्पादनक्षमता, खाद्याची गरज, वाढीचा वेग, रोगप्रतिकारक क्षमता, व्यवस्थापन पद्धती आणि बाजारपेठ वेगळी असते. त्यामुळे व्यवसाय सुरू करण्यापूर्वी उत्पादनाचा प्रकार, पक्ष्यांची संख्या, जात किंवा स्ट्रेन, खाद्याची उपलब्धता, बाजारपेठ आणि अपेक्षित नफा यांचा विचार करणे आवश्यक आहे.

कुक्कुटपालनासंबंधी अनेक गैरसमज केवळ शेतकऱ्यांमध्येच नव्हे, तर ग्राहकांमध्येही आहेत. विशेषतः अंड्यांचा रंग, अंड्यांची गुणवत्ता, कृत्रिम अंडी आणि कुक्कुट पालनातून मिळणाऱ्या नफ्याबाबत अनेक अफवा समाजमाध्यमांवर पसरतात. या गैरसमजांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे.



**अँटीबायोटिक्स म्हणजे वाढीचे साधन नाही**

पक्ष्यांची वाढ चांगली व्हावी म्हणून रोज अँटीबायोटिक्स द्यावीत, असा काहींचा समज आहे. प्रत्यक्षात अँटीबायोटिक्सचा अनावश्यक वापर कुक्कुट पालनाबरोबरच सार्वजनिक आरोग्यासाठीही गंभीर विषय आहे. त्यांचा वापर आवश्यकते नुसार आणि पशुवैद्यकीय मार्गदर्शनाखाली करणे गरजेचे आहे. विनाकारण किंवा चुकीच्या डोसमध्ये वापरल्यास जंतूंमध्ये औषधांविरुद्ध प्रतिकार निर्माण होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे योग्य लसीकरण, जैवसुरक्षा आणि व्यवस्थापनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

**जैवसुरक्षा ही खर्च नव्हे, गुंतवणूक आहे**

फार्ममध्ये कोणालाही प्रवेश दिला तरी काही होत नाही, हा गैरसमजही टाळणे आवश्यक आहे. माणसांच्या चपला, कपडे, हात, वाहने, उपकरणे आणि इतर पक्ष्यांच्या संपर्कातून रोगकारक जंतू फार्ममध्ये येऊ शकतात. म्हणून अनावश्यक व्यक्तींचा प्रवेश टाळणे, प्रवेशद्वारावर निर्जंतुकीकरणाची व्यवस्था करणे, उपकरणांची स्वच्छता करणे आणि बाहेरील पक्ष्यांचा संपर्क टाळणे महत्त्वाचे आहे. जैवसुरक्षा हा अतिरिकत खर्च नसून रोगामुळे होणारे मोठे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी केलेली गुंतवणूक आहे.

**गर्दी वाढली म्हणजे नफा वाढत नाही**

उपलब्ध शेडमध्ये जास्त पक्षी ठेवले तर उत्पादन आणि नफा वाढेल, अशी धारणा आहे. मात्र, पक्ष्यांची संख्या वाढवण्यापेक्षा योग्य घनता राखणे महत्त्वाचे आहे. जास्त गर्दीमुळे ताण वाढतो, खाद्य-पाण्यासाठी स्पर्धा होते, वायुवीजन कमी होते आणि रोगांचा प्रसार वेगाने होतो. परिणामी वाढ कमी होऊन मृत्युदर वाढू शकतो. म्हणून गर्दी = अधिक नफा हे समीकरण चुकीचे आहे.

अंड्याच्या कवचाचा रंग मुख्यतः कोबडीच्या आनुवंशिकतेवर अवलंबून असतो. त्यामुळे केवळ कवचाचा रंग पाहून अंड्याची पौष्टिकता किंवा गुणवत्ता ठरवता येत नाही. तांबडे किंवा पांढरे अंडे यापैकी कोणते चांगले, यापेक्षा अंडे ताजे आहे का, योग्य पद्धतीने साठवले आहे का आणि ते संतुलित आहाराचा भाग आहे का, हे अधिक महत्त्वाचे आहे.

**बाजारात कृत्रिम किंवा प्लॅस्टिकची अंडी?**

प्लॅस्टिकची अंडी, कृत्रिम अंडी किंवा रासायनिक अंडी याबाबत समाजमाध्यमांवर अनेक संदेश व व्हिडीओ फिरताना दिसतात. अंडे जुने झाल्यावर त्यातील पांढरा भाग, पिवळा बलक आणि कवचाच्या गुणधर्मांमध्ये बदल होतात. अयोग्य साठवणूक, तापमान आणि हाताळणीमुळे अंड्याचा पोतही बदलू शकतो. त्यामुळे विचित्र पोत किंवा चव दिसली म्हणून ते कृत्रिम आहे असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. संशय असल्यास अधिकृत प्रयोगशाळा किंवा संबंधित अन्नसुरक्षा यंत्रणेकडून तपासणी करून घेणे हा योग्य मार्ग आहे.

कोणताही आहार संतुलित प्रमाणात घेणे महत्त्वाचे आहे. आरोग्यविषयक निर्णय सोशल मीडिया संदेशांवर आधारित न घेता संबंधित तज्ज्ञांकडून माहिती घेणे योग्य आहे.

व्यक्तीचे एकूण आरोग्य, आहारातील इतर घटक, जीवनशैली, शारीरिक हालचाल आणि वैयक्तिक आरोग्यस्थिती यांचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे एका खाद्यपदार्थाला सर्व रोगांचे कारण मानण्यापेक्षा संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैलीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ●●●

### कुक्कुट पालन म्हणजे झटपट पैसा नाही

कुक्कुट पालनात तुलनेने कमी कालावधीत उत्पादन मिळू शकते; मात्र हा झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग नाही. पिल्ले, खाद्य, औषधे, लसीकरण, वीज, मजुरी, शेड, उपकरणे, मृत्युदर, बाजारभाव आणि वाहतूक या सर्व खर्चांचा विचार करावा लागतो. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी तांत्रिक आणि आर्थिक प्रकल्प अहवाल तयार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

मोठा फार्म म्हणजे मोठा नफा, हेदेखील आवश्यक नाही. खाद्य गुणोत्तर, मृत्युदर, वजन, अंडी उत्पादन, औषध खर्च, मजुरी, बाजारभाव आणि व्यवस्थापन कार्यक्षमता हे ना ठरवणारे महत्त्वाचे घटक आहेत. योग्य नियोजन आणि उत्तम व्यवस्थापन असलेला छोटा किंवा मध्यम फार्मही चांगला नफा देऊ शकतो.

कुक्कुट पालन हा केवळ कोंबड्या पाळण्याचा व्यवसाय नाही, तर आनुवंशिकता, पोषण, आरोग्य, व्यवस्थापन, अर्थकारण आणि बाजारपेठ यांचा समन्वय असलेला शास्त्रीय व्यवसाय आहे. अंधश्रद्धा, अफवा आणि अपूर्ण माहितीपेक्षा विज्ञान, निरीक्षण, नोंदवही, योग्य नियोजन आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे.

**- डॉ. निहाल अहमद अ. मुल्ला**
**- डॉ. प्रवीण न. चव्हाण**
कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी,
ता. बिलोली जि. नांदेड

---

हवामान

# वळिवाचा पाऊस चांगलाच बरसणार

**भौगोलिक घडामोडी** : सध्या मध्य उत्तर प्रदेशवर कमी दाबाचे क्षेत्र कायम असून, त्याच्याशी संबंधित चक्रीय वाऱ्यांची प्रणाली समुद्रसपाटीपासून सरासरी ४.५ किमी उंचीपर्यंत विस्तारलेली आहे.

**मान्सून द्रोणी (ट्रफ)** : श्री गंगानगर आणि नारनौलपासून सुरू होऊन मध्य उत्तरप्रदेश, देहरी, पुरुलिया आणि दिघामधून जात ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत पूर्व-आग्नेय दिशेने पसरलेली आहे.

**मध्यवर्ती द्रोणी** : दक्षिण गुजरातपासून मध्यप्रदेश ओलांडून मध्य उत्तर प्रदेशातील चक्रीय वाऱ्याच्या प्रवाहापर्यंत पसरलेली आहे.



**पश्चिमी विक्षोभ** : एक काश्मीरवर ५.८ किमी उंचीवर चक्रीय वाऱ्याच्या स्वरूपात आहे, तर दुसरा वरच्या हवेतील द्रोणी ७५ अंश पूर्व रेखांशाजवळ ७.६ किमी उंचीवर आहे. दक्षिणी द्रोणी : दक्षिण तेलंगणापासून मन्नारच्या आखातापर्यंत रायलसीमा आणि तामिळनाडू ओलांडून ०.९ किमी खोलीवर पसरलेली आहे.

**साप्ताहिक हवामान अंदाज** : राजस्थानमधून मान्सून माघारी फिरण्याचे संकेत, राज्यात १०-१४ सप्टेंबर दरम्यान तापमान वाढ होऊन दुपारनंतर स्थानिक जोरदार वळिवावा पाऊस होईल.

१५ तारखेला दक्षिण बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र बनत आहे, प्रतिचक्रीवादळी वाऱ्यामुळे त्याचा मार्ग बघता १६-२० सप्टेंबर दरम्यान मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात पूर परिस्थिती जोगा पाऊस शक्य. विदर्भात सुद्धा मध्यम पाऊस शक्यता राहील. ●●●

**- अभिषेक खेरडे**
हवामान अभ्यासक, अचलपूर

---

कृषी उत्पादन

# शाश्वत कांदा उत्पादनाची दुसरी पायरी अन्नद्रव्ये आणि पाणी व्यवस्थापन

कांद्याचे चांगले उत्पादन मिळवण्यासाठी केवळ दर्जेदार रोपे आणि योग्य लागवड पद्धत पुरेशी नाही. पिकाच्या संपूर्ण वाढीच्या काळात पाणी आणि अन्नद्रव्ये यांचे संतुलित व्यवस्थापन करणे तितकेच महत्त्वाचे आहे. विशेषतः कमी पाऊस, वाढते तापमान आणि अनियमित हवामानाच्या परिस्थितीत या तीन घटकांकडे दुर्लक्ष केल्यास उत्पादनाबरोबरच कांद्याची गुणवत्ता आणि साठवण क्षमताही प्रभावित होऊ शकते. अनेकदा पीक चांगले दिसत नाही म्हणजे अजून खत द्यावे या विचाराने शेतकरी जादा खतांचा वापर करतात. मात्र खत जास्त देणे म्हणजे उत्पादनही जास्त मिळेल असे नाही. जमिनीत पुरेसा ओलावा नसेल तर दिलेले अन्नद्रव्य पिकाला अपेक्षित प्रमाणात उपलब्ध होत नाही. उलट अतिपाण्यामुळे विशेषतः नत्रासारखी अन्नद्रव्ये वाहून जाण्याची शक्यता वाढते. त्यामुळे योग्य खत, योग्य मात्रा, योग्य वेळ आणि योग्य पद्धत हा शाश्वत कांदा उत्पादनाचा मूलमंत्र आहे.

**१. खतांचे एकात्मिक व्यवस्थापन**

कांद्याला संतुलित अन्नद्रव्यांचा पुरवठा करण्यासाठी सेंद्रिय खते, जैवखते, रासायनिक खते आणि उपलब्ध असल्यास फर्टिगेशन यांचा एकात्मिक वापर करणे कायदेशीर ठरते. लागवडीपूर्वी प्रति हेक्टर ५ टन चांगले कुजलेले शेणखत, कंपोस्ट किंवा गांडूळखत जमिनीत मिसळल्यास जमिनीची भौतिक अवस्था सुधारण्यास, ओलावा धरून ठेवण्यास आणि उपयुक्त सूक्ष्मजीवांच्या वाढीस मदत होते.

**कांद्यासाठी शिफारस केलेली हंगामनिहाय खत मात्रा**

खतांची मात्रा ठरवताना हंगाम, अपेक्षित उत्पादन, मातीचा प्रकार आणि माती परीक्षणाचा अहवाल यांचा विचार करावा. खालील मात्रा सामान्य मार्गदर्शनासाठी वापरता येतील.

**टीप** : तक्त्यात दिलेल्या खतांच्या मात्रा प्रति हेक्टर आहेत. प्रति एकर खत मात्रा काढण्यासाठी तक्त्यातील संबंधित मात्रेला २.५ ने भागावे.

| हंगाम | नत्र (प्रति हेक्टर) | स्फुरद (प्रति हेक्टर) | पालाश (प्रति हेक्टर) | गंधक (प्रति हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| खरीप | 100 कि.ग्रॅ. | 50 कि.ग्रॅ. | 50 कि.ग्रॅ. | 15–30 कि.ग्रॅ. |
| रांगडा | 110 कि.ग्रॅ. | 40 कि.ग्रॅ. | 60 कि.ग्रॅ. | 15–30 कि.ग्रॅ. |
| रब्बी | 110 कि.ग्रॅ. | 40 कि.ग्रॅ. | 60 कि.ग्रॅ. | 15–30 कि.ग्रॅ. |

जमिनीतील उपलब्ध गंधकाचे प्रमाण २५ कि.ग्रॅ./हे. पेक्षा जास्त असल्यास साधारण १५ कि.ग्रॅ. गंधक/हे., तर ते २५ कि.ग्रॅ./हे. पेक्षा कमी असल्यास ३० कि.ग्रॅ. गंधक/हे. देण्याची शिरस करता येते. यासोबत अझोस्पिरिलम आणि स्पुरद विरघळवणारे जीवाणू प्रत्येकी ५ कि.ग्रॅ./हे. वापरण्याची शिरस उपलब्ध असल्यास संबंधित स्थानिक कृषी मार्गदर्शक तत्त्वांनुसार करावी.



**खत देण्याची पद्धतही तेवढीच महत्त्वाची**

फक्त एकूण खत मात्रा किती दिली, हे महत्त्वाचे नसून, ती कधी आणि कशी दिली, हे अधिक महत्त्वाचे आहे. पारंपरिक पाटपाणी पद्धतीमध्ये पाण्याबरोबर अन्नद्रव्ये शेताच्या इतर भागात जाण्याची किंवा वाहून जाण्याची शक्यता असते. त्याउलट ठिबक सिंचनाखाली खत दिल्यास अन्नद्रव्ये मुळांच्या सक्रिय क्षेत्राच्या जवळ पोहोचवता येतात. विशेषतः नत्राचे व्यवस्थापन करताना ही बाब महत्त्वाची आहे. एकाच वेळी जास्त नत्र देण्यापेक्षा ते दोनन-तीन किंवा त्यापेक्षा अधिक हप्त्यांत देणे पिकाच्या गरजेनुसार अधिक परिणामकारक ठरू शकते. त्यामुळे पिकाची वाढ संतुलित राहण्यास मदत होते आणि खतांचा अनावश्यक अपव्यय कमी करता येतो.

**खरीप कांद्यासाठी खतांचे काही व्यवहार्य पर्याय**

खतांचे संयोजन ठरवताना उपलब्ध असलेली खते आणि त्यातील अन्नद्रव्यांचे प्रमाण लक्षात घेणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, १०:२६:२६, डीएपी + एमओपी, १२:३२:१६ किंवा १९:१९:१९ आधारित खत संयोजन वापरून शिफारशीत एनपीके मात्रा साध्य करता येते. कोणतेही एक मिश्र खत सर्व परिस्थितीत सर्वोत्तम असेलच असे नाही. त्यामुळे उपलब्ध खतांमधून शिफारशीत अन्नद्रव्यांची एकूण मात्रा पूर्ण होते की नाही, हे तपासणे महत्त्वाचे आहे.

खरीप कांद्यात १००:५०:५० एनपीके +१५-३० कि.ग्रॅ. गंधक/हे. या लक्ष्य मात्रेनुसार विविध खत पर्याय वापरता येतात. उदाहरणार्थ, १०:२६:२६ आधारित पद्धतीत बेसल खतासोबत पुढील हप्त्यांमध्ये युरिया देऊन नत्राची गरज पूर्ण करता येते. डीएपी आधारित पद्धतीत डीएपी आणि एमओपीचा बेसल वापर करून उर्वरित नत्र युरियातून देता येते. १२:३२:१६ आणि १९:१९:१९ आधारित संयोजनांमध्येही याच तत्त्वानुसार एकूण एनपीके मात्रा संतुलित करता येते.

**अन्नद्रव्ये व्यवस्थापन**

**१. खरीप कांदा, पाटपाणी पद्धती**

सेंद्रिय खतांचा वापरः शेवटच्या कुळवणीच्या वेळी प्रति हेक्टर ५ टन चांगले कुजलेले सेंद्रिय खत जमिनीत मिसळावे. यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब, जमिनीची भौतिक रचना, पाणी व अन्नद्रव्ये धरून ठेवण्याची क्षमता सुधारण्यास तसेच अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होते.

**जैवखतांचा वापरः** लागवडीच्या वेळी अॅसिटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळवणारे जीवाणू प्रत्येकी ५ कि.ग्रॅ./हे. या प्रमाणात ५० कि.ग्रॅ. चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून द्यावेत.

**रासायनिक खतांचा वापरः** शिफारशीत नत्राच्या १५-२० टक्के मात्रेसोबत स्फुरद, पालाश आणि गंधकाची संपूर्ण शिारशीत मात्रा पुनर्लागवडीच्या वेळी बेसल डोस म्हणून द्यावी. उर्वरित ८०- ८५ टक्के पुनर्लागवडीनंतर १५, ३० आणि ४५ दिवसांनी तीन समान हप्त्यांत द्यावे. यासाठी युरिया, १०:२६:२६ व बेंटोनाइट गंधक किंवा पर्यायाने डीएपी व बेंटोनाइट गंधकाचा वापर करता येतो.

**टीप** : तक्त्यातील सर्व खतांच्या मात्रा प्रति हेक्टर आहेत. प्रति एकर मात्रा काढण्यासाठी संबंधित मात्रा २.५ ने भागावी.

**सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापरः** पुनर्लागवडीनंतर ४५, ६० आणि ७५ दिवसांनी सूक्ष्म अन्नद्रव्यांचे मिशण ५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारावे. ●●●

**- डॉ. संकेत मोरे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ, भाकृअनुप-कांदा व लसूण संशोधन संचालनालय, पुणे

1. खतांचे पर्याय

| खत पर्याय | लागवडीच्या वेळी (बेसल) | पुनर्लागवडीनंतर १५ दिवसांनी | ३० दिवसांनी | ४५ दिवसांनी |
|---|---|---|---|---|
| १. १०:२६:२६ आधारित | १०:२६:२६ – १९३ कि.ग्रॅ./हे. MOP – ० कि.ग्रॅ./हे. बेंटोनाइट गंधक – ३३ कि.ग्रॅ./हे. | युरिया – ५९ कि.ग्रॅ./हे. | युरिया – ५९ कि.ग्रॅ./हे. | युरिया – ५९ कि.ग्रॅ./हे. |
| २. DAP आधारित | DAP – १०९ कि.ग्रॅ./हे. MOP – ८३ कि.ग्रॅ./हे. बेंटोनाइट गंधक – ३३ कि.ग्रॅ./हे. | युरिया – ६८ कि.ग्रॅ./हे. | युरिया – ६८ कि.ग्रॅ./हे. | युरिया – ६८ कि.ग्रॅ./हे. |

❍ संयोजक : **निखिल रमेश यादव,** कृषी पदव्युत्तर - ८४०८९१२७०६ ❍

# अमली पदार्थांपासून दूर राहा : नीलाभ रोहन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ सप्टेंबर-**

आजच्या डिजिटल युगात अमली पदार्थांचे सेवन, सोशल मीडियाचा अतिवापर आणि सायबर गुन्हे ही तरुणांसमोरील गंभीर आव्हाने आहेत. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून स्वतःला दूर ठेवतानाच आपल्या मित्रपरिवारालाही त्यापासून परावृत्त करावे. वाहन चालविताना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे आणि आपत्कालीन परिस्थितीत 'डायल ११२' या सेवेचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन नांदेडचे पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि 'स्वयंसिद्धा' स्त्रीशक्ती उपक्रमाच्या संयुक्त विद्यमाने 'अमली पदार्थ प्रतिबंध, महिला सुरक्षा व वाहतूक नियम' या विषयावर विद्यापीठाच्या सभागृहात विशेष जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष आणि झूमच्या माध्यमातून मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन उपस्थित होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक सुप्रिया केंद्रे, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर दा. पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बाबासाहेब सुरवसे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन यांनी प्रभावी पीपीटी सादरीकरणाद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अमली पदार्थांचे सेवन केवळ व्यक्तीचे आरोग्यच नव्हे, तर कुटुंब आणि संपूर्ण समाजाच्या भवितव्यावर परिणाम करते. तरुणाई ही देशाची सर्वात मोठी शक्ती असून तिच्या ऊर्जेचा सकारात्मक वापर होणे आवश्यक आहे. सोशल मीडियाचा अतिवापर, सायबर गुन्हे आणि डिजिटल माध्यमांमधून निर्माण होणाऱ्या विविध धोक्यांबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना सावध केले.

रस्ते अपघात टाळण्यासाठी हेल्मेट व सीट बेल्टचा वापर, वेगावर नियंत्रण आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या तातडीच्या मदतीसाठी 'डायल ११२' ही महत्त्वाची सेवा असून संकटाच्या प्रसंगी तिचा योग्य आणि प्रभावी वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक सुप्रिया केंद्रे यांनी महिलांच्या संरक्षणासाठी असलेले विविध कायदे, उपलब्ध शासकीय यंत्रणा आणि सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महिलांनी आपल्या कायदेशीर अधिकारांची जाणीव ठेवाव. विद्यार्थ्यांनी जागरूक राहण्याबरोबरच आपल्या परिसरातही महिला सुरक्षा आणि कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांनी केले, तर 'स्वयंसिद्धा'च्या समन्वयिका डॉ. नीना गोगटे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अंतर्गत तक्रार समितीच्या समन्वयिका डॉ. संगीता माकोने, स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयिका डॉ. शालिनी कदम तसेच विद्यार्थी विकास कक्ष समितीचे सदस्य डॉ. योगिनी सातारकर, डॉ. बाबुराव जाधव, डॉ. राजकुमार मून, डॉ. नंदकुमार बोधगीरे आणि डॉ. रणजीत तेहरा यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नायगाव तालुक्यातील रखडलेल्या विकासकामांचा उद्धवसेनेने मागितला जाब

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ९ सप्टेंबर-**

नायगांव तालुक्यातील विविध विकासकामांच्या घोषणा होऊन अनेक वर्षांचा कालावधी लोटला असतानाही अनेक कामे अद्याप रखडलेली आहेत. काही कामे कागदावरच असून काही कामे संथगतीने सुरू आहेत. या रखडलेल्या विकासकामांचा जाब विचारत ती तातडीने पूर्ण करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर विविध सरकारांच्या काळात छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठका तसेच नांदेड जिल्हा नियोजन समिती च्या बैठकीत नायगांव तालुक्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण विकास कामांच्या घोषणा करण्यात आल्या.मात्र,या घोषणां ची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप पूर्ण झालेली नसल्याने जनतेला विकासकामांची प्रतीक्षा करावी लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.मराठवाड्याचा विकास तुम से ना हो पायेगा!या घोषवाक्याखाली १ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विविध सरकारांनी केलेल्या विकासकामांच्या घोषणांचा वस्तुस्थिती दर्शक हिशोब जनतेसमोर मांडण्यात येत आहे. किती कामे पूर्ण झाली आहेत



किती कामे सुरू आहेत आणि किती कामे रखडली आहेत याची माहिती जनतेसमोर मांडण्याची भूमिका पक्षाने घेतली आहे.

नायगाव तालुक्यातील नरसी-घुंगराळा येथील २२२ के.व्ही. केंद्र तातडीने सुरू करावे तसेच शेळगाव छत्री ते कुंटूर मार्गावरील कोकलेगांव येथील पुलाचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नायगाव तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी जास्ती जास्त अनुदान द्यावे, अशीही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या शिवाय तालुक्यातील अनेक गावातील समश्यानभूमीचे या सारखे प्रश्न हे तातडीने मार्गी लावावेत तसेच जलजीवन मिशनच्या कामांची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर विधानसभा प्रमुख नायगांव राजेश लंगडापुरे, विधानसभा उपसंघटक नायगाव बालाजी माली, शहरप्रमुख नायगांव रविंद्र शिवाजी भिलवंडे, तालुका संघटक गजानन तमलुरे, तालुकाप्रमुख नायगांव मारोती भागानगरे, तालुकासमन्वयक भागवत पाटील शिंदे, उपतालुकाप्रमुख बालाजी कुरे, उपतालुका प्रमुख साहेबराव हेंडगे आणि उपतालुकाप्रमुख शंकर तमवाड यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.तसेच सर्कल प्रमुख बरबडा प्रभाकर मेघळ, मांजरम सर्कल

प्रमुख मांजरम शिवाजी शिंदे, सर्कल प्रमुख कुंटूर रावसाहेब वडजे,नरसी सर्कल प्रमुख नागेश कुऱ्हाडे, उपसर्कलप्रमुख मुगांव गंगेश सर्जे, उपसर्कलप्रमुख बरबडा प्रभाकर पापंटवार, उपसर्कलप्रमुख कुष्णूर माधव वानखेडे, उपसर्कलप्रमुख गडगा प्रभाकर, उप सर्कल प्रमुख मांजरम अनिकेत शिंदे, उपसर्कलप्रमुख कुंटूर देविदास मारोती बेलकर आणि उपसर्कलप्रमुख देगाव पांडुरंग पाटील मोरे यांचाही समावेश आहे.

यावेळी अल्पसंख्याक तालुका संघटक इम्रान मदार बेग, युवासेना तालुका संघटक शिवाजी इबितदार, शाखा प्रमुख मुगाव संतोष देशमुख,बंडु कवठेकर, नरसी ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर गायकवाड , सदस्य नरसी रफीक अहेमद खान पठाण यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## देवला तांडा येथील पवार कुटुंबियांचे आमदार चिखलीकरांनी केले सांत्वन



**लोहा-** दुचाकीमध्ये इंधन भरण्यासाठी जाणाऱ्या मोटारसायकल स्वरांचा बसच्या धडकेने मृत्यू झाला .देवलातांडा येथील दोघांचे या अपघातात निधन झाले ही घटना रविवारी घडली.सोमवारी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पवार कुटुंबियांची भेट घेतली व सांत्वन केले. देवला तांडा ( ता.लोहा) येथील गणा पवार यांचा मुलगा कै.गोविंद नाना पवार व प्रकाशराव पवार यांचा मुलगा कै.आकाश प्रकाशराव पवार यांचे लांडगेवाडी येथे अपघातात निधन झाले, त्यांच्या परिवाराची आ चिखलीकर यांनी भेट घेतली व सांत्वन केले. नगराध्यक्ष शरद पवार, पंचायत समितीचे माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे ढाकणीकर, माजी सभापती शंकरराव ढगे, परमेश्वर मुरकुटे, अर्जुन राठोड, रमेशराव राठोड, बंडू पाटील काळे, भीमराव लामदडे, रुस्तुमराव राठोड यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## नगरसेवक प्रतिनिधी सतीश बसवदे यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी

**नवीन नांदेड-** नांदेड शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २० मधील भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका सौ. सुवर्णा सतीश बसवदे यांचे पती सतीश बसवदे हे स्वतः लोकप्रतिनिधी असल्याचे भासवून जनतेची व प्रशासनाची दिशाभूल करत असल्याने त्यांच्यावर



फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी सिडको ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या महिला अध्यक्षा सौ. ज्योती कदम यांनी मनापाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्याकडे दिनांक ७ सप्टेंबर रोजी एका निवेदनाद्वारे केले. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक २० (ड) या महिला आरक्षित प्रभागातून भाजपच्या सौ. सुवर्णा सतीश बसवदे या निवडणूक निवडून आल्या आहेत. त्यामुळे त्यांचे पती सतीश बसवते स्वतः आपणच निवडून आलो असल्याचे भासवून सोशल मीडिया, फेसबुक, इंस्टाग्रामवर लोकांना दाखवून देत असल्याचे, गैरकायदेशीर आहे .लोकप्रतिनिधी सारखे ठामपणे कोणत्याही बैठकीस सहभागी राहून बेकायदेशीर पद्धतीने शासकीय अधिकारी यांची दमदाटी करत आहेत.व प्रशासकीय कामात अडथळा निर्माण करतो .अशा प्रकारे प्रशासनास वेटीस धरून जनतेत आपणच नगरसेवक आहोत. असा प्रकारचा समज करून तोतेगिरी करत असल्याची तक्रार सतीश बसवदे यांच्या विरोधात सौ.ज्योती कदम महिला अध्यक्ष सिडको ब्लॉक काँग्रेस कमिटी नांदेडच्या वतीने मनापा आयुक्त डॉक्टर महेश कुमार डोईफोडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

## बाऱ्हाळीत संत सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**बाऱ्हाळी-** येथे संत सेना महाराज यांची पुण्यतिथी भक्तिमय आणि उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त ह.भ.प. नामदेव महाराज दापकेकर यांनी कीर्तनाच्या माध्यमातून उपस्थित भक्तांना मार्गदर्शन



केले. बाऱ्हाळी ता. मुखेड येथे प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही मंगळवार दि. ८ सप्टेंबर रोजी संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी ह.भ.प. नामदेव महाराज दापकेकर यांनी कीर्तनाच्या माध्यमातून संत सेना महाराज यांच्या कार्याची ओळख करून दिली नामदेव महाराज यांच्या प्रबोधनानंतर उपस्थित भक्तांनी संत सेना मंदिरात महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी परिसरातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजाराम अवधूते, ज्ञानेश्वर कोतवाले, सूर्यकांत कोतवाले, नारायण कोतवाले, शिवाजी अवधूते, हणमंत अवधूते, अशोक कोतवाले यांच्यासह बाऱ्हाळी समस्त नाभिक मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# मुदखेड तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ९ सप्टेंबर-**

गेल्या दोन महिन्यापासून पावसाने दांडी मारल्यामुळे मुदखेड तालुक्यातील खरीप हंगामातील पिकांवर गंभीर संकट निर्माण झाले असून, मुदखेड तालुका कोरडा दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावा आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मुदखेड शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली.

याबाबत तहसीलदार, मुदखेड यांना निवेदन देण्यात आले. तालुक्यात अपेक्षित



प्रमाणात पाऊस झालेला नसल्याने सोयाबीन, कापूस, तूर आदी खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक भागांत जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिकांची वाढ खुंटली असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

शेतकऱ्यांनी पेरणी, खते, कीटकनाशके, मशागत व मजुरीसाठी मोठा खर्च केला आहे. मात्र पावसाअभावी खरीप हंगाम वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तालुक्यातील सर्व गावांमध्ये तातडीने वस्तुनिष्ठ पर्जन्यमान व पिकांची पाहणी करून पंचनामे करावेत, तसेच मुदखेड तालुका कोरडा दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

तसेच दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये आर्थिक मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, पीक विम्याची रक्कम मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी आणि आगामी काळात पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता याबाबत प्रशासनाने योग्य नियोजन करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

यावेळी उपस्थित जिल्हा काँग्रेस कमीटीचे संघटक गोविंदराव गोपनपल्ले, जिल्हा सचिव सुर्यकांत चौदंते सर, जिल्हा सहसचिव गिरीश कोत्तावार, शेख करीम शेख सादत,न.पा.माजी उपाध्यक्ष,भगवानराव मनुरकर,पाटील मगरे सेवादल तालुकाध्यक्ष, युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, खदीर खुरेशी, विठ्ठल आचार्य, वेदांत शेवटे, रमेश बोडके, मुल्ला गौस, गजानन पांचाळ, सुभाष चौदंते, सुरेश ढगे, श्याम पाटील शिंदे, नागोराव पाटील भांगे,माणिकराव मुंगल, केशव पाटील शिंदे, अनिस भाई, लखन कार्ले, यासह आदि काँग्रेस कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# स्वच्छतेचे आवाहन करणाऱ्या पंचायत समिती, तहसील कार्यालय परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ९ सप्टेंबर-**

केंद्र व राज्य सरकारकडून स्वच्छतेसाठी विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन केले जात असताना हदगाव येथील पंचायत समिती कार्यालय, तहसील कार्यालय तसेच बाल विकास प्रकल्प कार्यालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा साचला आहे. या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना नाकावर रुमाल बांधून वावरावे लागत आहे.

पंचायत समिती कार्यालय, तहसील कार्यालय आणि पुरवठा विभागात तालुक्यातील तसेच



शहरातील नागरिक विविध कामांसाठी दररोज ये-जा करतात. मात्र, कार्यालय परिसरात कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पावसाने उघडीप दिल्याने उकाडा वाढला असून, कचऱ्यामुळे रोगराई पसरण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त होत आहे. बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी महिला आपल्या लहान बालकांसह मोठ्या संख्येने येतात. परिसरातील दुर्गंधी आणि अस्वच्छतेचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महिला व बालकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन परिसराची स्वच्छता करावी, अशी मागणी नागरिक व महिला वर्गातून होत आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती करणाऱ्या शासकीय कार्यालयांनी प्रथम आपल्या कार्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवावा, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे. संबंधित कार्यालय प्रमुखांनी त्वरित उपाययोजना करून कचरा हटवावा व नियमित स्वच्छता व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर इस्लापूर पोलीसांची शांतता समितीची बैठक

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ९ सप्टेंबर-**

आगामी पोळा, गणेशोत्सव तसेच अन्य सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि सर्व सण-उत्सव शांततेत व उत्साहात पार पडावेत, यासाठी इस्लापूर पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक पार पडली.

बैठकीत सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांनी आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. डीजेच्या वापरावर बंदी असल्याने कोणत्याही गणेश मंडळाने डीजेचा वापर करू नये, तसेच ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

गणेशोत्सव काळात मंडळांनी मंडप उभारणी, मिरवणूक, ध्वनिक्षेपक, वाहतूक व्यवस्था तसेच सार्वजनिक सुव्यवस्थेबाबत पोलिसांशी समन्वय ठेवावा. कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घेत सामाजिक सलोखा व शांतता कायम ठेवावी, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांनी केले.

यावेळी इस्लापूर ग्राम पंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी व सदस्य, परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, पोलीस पाटील तसेच विविध गणेश मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

# आजीच्या स्मृतींना अनोखी आदरांजली; परमरहस्य ग्रंथ, बेलाचे वृक्ष वाटप

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ९ सप्टेंबर-**

आयुष्यभर ज्या मायेच्या सावलीत संस्कार मिळाले, त्या आजीच्या स्मृती केवळ आठवणीत न ठेवता त्यांना सामाजिक आणि सांप्रदायिक उपक्रमातून चिरंतन करण्याचा अनोखा प्रयत्न देगलूर तालुक्यातील मंडगी येथे पाहायला मिळाला. कै. गंगाबाई ईरयाप्पा स्वामी यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त परमरहस्य ग्रंथ व बेलवृक्ष वाटप तसेच कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी शिवभक्त पारायण अखिलेश महाराज कुरुंदा यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम झाला. भक्ती, अध्यात्म आणि संस्कार यांची सांगड घालत महाराजांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांना परमरहस्य ग्रंथ व बेलवृक्ष देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामुळे पुण्यस्मरणाचा हा सोहळा धार्मिकतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाराही ठरला.

कै. गंगाबाई ईरयाप्पा स्वामी या रामलिंग स्वामी मंडगीकर यांच्या आजी होत.




रामलिंग स्वामी मंडगीकर यांनी आपल्या आजीची जीवंतपणी मनोभावे सेवा केली होती. आजीच्या ऋणाची जाणीव ठेवत त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सांप्रदायिक कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांनी समाजासमोर ज्येष्ठांच्या सेवेला आणि संस्कारांच्या जपणुकीला नवा अर्थ दिला.

आई-वडिलांची सेवा करणे हे आपले कर्तव्य आहेच; मात्र आजी-आजोबांचीही तितक्याच आपुलकीने सेवा केली पाहिजे. त्यांच्या अनुभवातून आणि संस्कारातून मिळालेला विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या. आजच्या बदलत्या सामाजिक वातावरणात वृद्धांचे महत्त्व आणि कुटुंबातील ज्येष्ठांप्रती असलेली आपली जबाबदारी अधोरेखित करणारा हा सोहळा ठरला.

**आईची पुण्यतिथी असतानाही कार्यकर्त्याच्या कुटुंबासाठी उपस्थिती**

कार्यक्रमास शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहरराव धोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे याच दिवशी मनोहरराव धोंडे यांच्या आईची पुण्यतिथी असतानाही त्यांनी आपल्या कार्यकर्त्याच्या कौटुंबिक कार्यक्रमास उपस्थित राहून सामाजिक बांधिलकी जपली. कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची त्यांची भूमिका यावेळी प्रकर्षाने जाणवली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी वैजनाथ तोनसुरे (राज्य उपाध्यक्ष, शिवा संघटना), अनिल माळगे (जिल्हा संपर्कप्रमुख, नांदेड), अशोक मजगे (जिल्हा उपाध्यक्ष, शिवा संघटना नांदेड), अनिल पाटील खानापूर (जिल्हा चिटणीस, भाजपा नांदेड), अशोक साखरे (जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा नांदेड), रामदास पाटील सुमठाणकर (माजी सनदी अधिकारी) आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी वर्षाताई देशमुख (महिला तालुकाध्यक्ष, शिवा संघटना देगलूर) व रेखाताई देवाडे (शहराध्यक्ष, देगलूर) यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी सुभाष पाटील चैनपुरकर (तालुकाध्यक्ष), पंडित पाटील (अध्यक्ष, बिचकुंदा मंडल), हाणमंत भवरे (तालुका उपाध्यक्ष), लक्ष्मण मुंगडे, बस्वराज द्याडे (नगरसेवक प्रतिनिधी), शिवकुमार देवाडे (भाजपा तालुकाध्यक्ष, देगलूर), घाळप्पा अंबेसंगे, रमेश जिरगे, बन्सी पटेल, बाशूमियाँ आदमपूर, संजय पांचाळ (जिल्हा संयोजक सोशल मीडिया भाजपा), ॲड. श्रीकांत कोंपले, संजय पोकर्णा, अंबादास नरंगलकर, केदार पडगे आलूर, शिवराज हंडे, नारायण पाटील, हाणंमत काळेशे, शांतेश्वर पाटील, शिवराज मुंडकर, बस्वराज मठवाले आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुण्यस्मरणाच्या निमित्ताने बेलवृक्ष वाटप, परमरहस्य ग्रंथाचे वितरण आणि कीर्तनाच्या माध्यमातून दिलेला सेवा, संस्कार व पर्यावरण संवर्धनाचा संदेश या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. कै. गंगाबाई ईरयाप्पा स्वामी यांच्या स्मृतींना भावपूर्ण आदरांजली वाहत त्यांच्या संस्कारांचा वारसा जपण्याचा संकल्प या निमित्ताने करण्यात आला.